❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# शेवटचं आंदोलन, मागणीत माघार नाही

## अंतरवालीतून जरांगे पाटलांचा पुन्हा एल्गार, म्हणाले मुंबईकडे कूच करणार

■ जालना (दै. संध्या)

मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र, जात पडताळणी समिती या मुद्द्यांवरुन राज्य सरकारला इशारा दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, जरांगे पाटलांनी उपोषणाला सुरुवात केली असून आज पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येनं मराठा बांधव अंतरवाली सराटीत दाखल झाल्याचं दिसून आलं. या बाधवांना जरांगे पाटलांनी संबोधित करताना, लवकरच मुंबई गाठण्याची तारीख जाहीर करू असे म्हटले.

आपल्याला महाराष्ट्रातील, मुंबईतील मराठ्यांनी नावं नाही ठेवले पाहिजे, हेही संस्कार जपले पाहिजेत. यावेळी, विजयापासून लांब जाऊ द्यायचं नाही ही जबाबदारी आपली आहे. यंदाचे उग्र आंदोलन सुद्धा मराठ्यांची शांतता उग्र वाटली पाहिजे. हे शेवटचं आंदोलन, याच्या मागणीत एकही माघार नाही. महाराष्ट्रातील बांधव बोलावून मुंबईची तारीख ठरवणार आहे. तीन दिवसात मराठा मुंबईला नेऊन वापस आणलेला आपल्याला परवडणार



नाही. त्यामुळे पक्की तयारी करायची आहे. येत्या 12 तारखेला मुंबईच्या तारखेची घोषणा करू, मुंबईत 5 टप्प्यात आंदोलन होईल अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

मी काय चीज आहे हे अजित दादा, फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना माहिती आहे, मी साधं रसायन नाही, त्यांच्यात चर्चा होती. त्यामुळे, ही लढाई आपल्याला नियोजनबद्ध करावी लागणार आहे. फडणवीस-शिंदेंच्या डोक्याला मुंग्या आल्या पाहिजेत. सरकारला माज आलाय, आमचे कोणीच काही करू शकत नाही असं त्यांना वाटतंय. पण, मराठ्यापुढे सत्तेच शहाणपण चालत नाही. एकदा प्लॅनिंग झाली तर मुंबईच नाही दिल्ली सुद्धा हलवू शकतो, अशा शब्दात जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला आहे. मला बोलता आले नाही तरी मला वर्षावर घेऊन जा, मी बारका दिसतो पण 10-12 जण पाडू शकतो. मुंबईला 40-45 लाख मोटरसायकल काढायच्या आहेत, मी एकटा ट्रकवर येतो, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

मनोज जरागे यांनी साठीतील मराठा समाज बांधवांना देखील आवाहन केलंय. म्हातारे माणसं जे 50-60 च्या आतचे आहेत, त्यांनी मुंबईला चला. तरुण झुंजणार तर मग म्हातारे नोकरी करणार का? पारावर वेळ घालवण्यापेक्षा, समाजासाठी लढा, असे जरांगे पाटील यांनी म्हटले.

### १२ तारखेला मुंबईची तारीख

इथे कोणताच समाज सुखी नाही. मुंबईतील ना मराठी माणूस सुखी आहे, ना परप्रांतीय, मारवाडी आणि जैनसुद्धा सुखी नाही. डी.बी. पाटलांचे नाव सुद्धा विमानतळाला द्यायला हे तयार नाहीत, यांना माज आलाय. 12 तारखेला जी तारीख ठरेल त्याची तयारी करावी. मुंबईतील मराठ्यांनी फक्त जेवण कमी पडू देऊ नये, असे म्हणत पुन्हा एकदा मुंबईला जायची तयारी सुरू असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं.

# नेपाळमध्ये महापुराचा हाहाकार !

## महाराष्ट्राचे ६० पर्यटक बेपत्ता, ४०४ पैकी ३३८ नागरिक सुरक्षित; महत्त्वाची माहिती समोर

■ मुंबई (दै. संध्या)



नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरामुळे मोठा विध्वंस झाला असून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या महाप्रलयात शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला असून हजारो लोक बेपत्ता असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या नैसर्गिक आपत्तीचा फटका केवळ नेपाळलाच नाही, तर इतर अनेक देशांनाही बसला आहे. या पुराच्या तडाख्यात महाराष्ट्रातील अनेक पर्यटकही नेपाळ आणि तिबेटच्या सीमाभागात अडकले आहेत.

मिळालेल्या शासकीय अहवालानुसार, 26 ऑगस्ट रोजी अचानक आलेल्या या पुरामुळे नेपाळ-तिबेटमध्ये महाराष्ट्रातील एकूण 404 पर्यटक अडकले होते. त्यापैकी प्रशासनाने 338 नागरिकांशी संपर्क साधून ते सुरक्षित असल्याची खात्री केली आहे. या सुरक्षित पर्यटकांपैकी 37 जणांचा एक गट सागा (तिबेट) येथून निघाला असून त्यांना सुखरूपपणे भारतात परत आणले जात आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या 404 पर्यटकांपैकी 60 नागरिक अद्याप बेपत्ता आहेत. हे सर्वजण मुंबईतील एका ट्रॅव्हल कंपनीच्या माध्यमातून नेपाळला गेले होते. प्रशासनाला अद्याप या गटाशी थेट संपर्क साधण्यात यश आलेले नाही. याशिवाय, अन्य सहा नागरिकांची माहिती एका ऑनलाइन लिंकद्वारे प्रशासनाला प्राप्त झाली असली तरी, अधिकाऱ्यांचा त्यांच्याशीही अद्याप कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही. परराष्ट्र मंत्रालयाने सध्या चीन आणि तिबेटच्या प्रदेशात सुरक्षित असलेल्या 149 भारतीयांची यादी महाराष्ट्र सरकारकडे सुपूर्द केली आहे. हे नागरिक राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांचे रहिवासी आहेत. त्यांची ओळख पटवणे आणि पुढील कार्यवाहीच्या समन्वयासाठी राज्य सरकारने ही यादी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवली असून, त्यांच्यामार्फत या सर्व नागरिकांची माहिती गोळा करण्याचे काम वेगाने सुरू आहे. राज्याचे आपत्कालीन कार्य संचालन केंद्र परराष्ट्र मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाशी सातत्याने समन्वय साधून आहे. बेपत्ता आणि सुरक्षित नागरिकांच्या अद्ययावत याद्या नियमितपणे अद्ययावत करून पाठवल्या जात आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार बाधित भागांमध्ये बचाव पथके तैनात करण्यात आली असून, बेपत्ता असलेल्या नागरिकांचा कसून शोध घेण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.

## थोडक्यात...

### सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर

नवी दिल्ली : दैनिक संध्या

आता जर पॅकेटबंद खाद्यपदार्थांमध्ये संतृप्त चरबी, साखर आणि मिठाचे प्रमाण ठरलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर कंपन्यांना पॅकेटवर षटकोनी आकाराचे लाल चिन्ह लावावे लागेल. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर करून याची माहिती दिली आहे. याचा उद्देश ग्राहकांना अशा खाद्यपदार्थांबद्दल जागरूक करणे आहे, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. '3S अँड अवर हेल्थ सोसायटी' नावाच्या एका सार्वजनिक धर्मादाय संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून डबाबंद किंवा पॅकेटमधील खाद्यपदार्थांवर अनिवार्य चेतावणी लेबल लावण्याची मागणी केली होती. या प्रकरणाच्या मागील सुनावणीदरम्यान (13 ऑगस्ट), न्यायमूर्ती जे.बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने FSSAI ला नियमांना विलंब केल्याबद्दल फटकारले होते आणि विचारले होते की, सरकारला आपले लोक निरोगी राहावेत असे वाटत नाही का? त्यानंतर FSSAI ने हे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

### जनगणनेत OBC साठी स्वतंत्र कॉलम हवा

मुंबई : दैनिक संध्या

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पक्षाच्या विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा होणार नसल्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांनी स्पष्ट केले. पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच राज्यातील विविध प्रश्नांवरही देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधताना सरकारवर निशाणा साधला. विशेषतः जातिनिहाय जनगणना, ओबीसी समाजाची आकडेवारी, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन, नाशिकमधील कथित बोगस भरती प्रकरण आणि मतदार यादीतील विशेष पुनरावलोकन प्रक्रिया या मुद्द्यांवर त्यांनी भूमिका मांडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाची कोअर कमिटीची बैठक मुंबईत पार पडत असताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबत चर्चा होणार असल्याच्या राजकीय चर्चांना उधाण आले होते. मात्र, या चर्चांना अनिल देशमुख यांनी स्पष्टपणे नकार दिला. पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत विलिनीकरणाचा कोणताही विषय नसल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवणे, आगामी काळातील पक्षाचे काम आणि विविध राजकीय प्रश्नांवर चर्चा करणे हा बैठकीचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याआधी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनीही बैठकीत पक्ष संघटनेतील राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय बदल, नव्या पदाधिकाऱ्यांना संधी आणि आगामी काळातील राज्यव्यापी दौऱ्यांच्या नियोजनावर चर्चा होणार असल्याचे सांगितले होते. त्यामुळे सध्या तरी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून विलिनीकरण किंवा सत्ताधारी आघाडीसोबत जाण्याचा कोणताही अधिकृत प्रस्ताव नसल्याचे चित्र आहे. अनिल देशमुख यांनी केंद्र सरकारच्या जातिनिहाय जनगणनेच्या प्रश्नावलीवर गंभीर आक्षेप घेतला. प्रश्नावलीमध्ये अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्यासाठी स्वतंत्र रकाने आहेत; मात्र इतर मागासवर्गीय (OBC) समाजासाठी स्वतंत्र जातनिहाय रकाना नसल्याचे त्यांनी सांगितले. देशमुख यांच्या मते, ओबीसी समाजामध्ये अनेक जातींचा समावेश होतो. त्यामुळे ओबीसीसाठी स्वतंत्र रकाना ठेवून त्यामध्ये संबंधित जातीची नोंद केली गेली, तर देशातील ओबीसी समाजाची वास्तविक जातनिहाय लोकसंख्या स्पष्ट होऊ शकते.

# तुकाराम मुंढेंना महाराष्ट्राचं मुख्यमंत्री करा

## थेट अमित शहांना धाडलं पत्र, राज ठाकरेंचंही केलं कौतुक

■ मुंबई (दै. संध्या)

तुकाराम मुंढे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त झाल्यापासून त्यांनी कारवाईचा जोरदार धडाका सुरु केला आहे. भेसळखोरांच्या विरोधात त्यांनी कठोर पावलं उचलली आहेत. त्यांच्या कामाचं सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. अशातच आम्ही गिरगावकर संघटनेने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहलं आहे. यामध्ये त्यांनी तुकाराम मुंढे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करा अशी मागणी केली आहे. या पत्रात राज ठाकरेंचं देखील कौतुक करण्यात आलं आहे. मुंबईतील मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात कारवाईची मागणी करण्यात आली आहे. मराठी भाषिकांच्या घरांवर हातोडा चालवला जात असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. परप्रांतीय रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी येत नसतानाही परवाने दिले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. तसेच मुंबईतील राखीव मैदाने, आरक्षित भूखंड आणि महत्त्वाच्या जागा धनाढ्य लोकांच्या घशात घातल्या जात असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे. सरकार महाराष्ट्राचे आहे. मात्र येथील मंत्री राजस्थान, गुजरात आणि बिहारचे, अशी टीका देखील या पत्रात करण्यात आली आहे. राज्याच्या लोकसंख्येचा गळा घोटून त्यांच्या जागी 'भोजपुरी ठेका' धरण्याचा आरोप देखील या पत्रात करण्यात आला आहे. बाळासाहेब ठाकरे हयात नाहीत, म्हणून मुंबई बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे. तसेच हे सगळं रोखायला राज ठाकरे भक्कम असल्याचे या पत्रात म्हटले आहे. महाराष्ट्र आणि मराठीच्या हिताचे सर्व निर्णय कोणताही दबाव न जुमानता तुकाराम मुंढे घेऊ शकतात असे पत्रात म्हटलं आहे. मराठी भाषीकांवर होणारा अन्याय थांबवण्यासाठी नवीन कायदा बनवून मराठी माणसांना नवीन इमारतीत राखीव घरे ठेवण्यासाठी तुकाराम मुंढेच पाहिजेत असेही पत्रात म्हटलं आहे. मुंबईतील राखीव मैदाने, आरक्षित भुखंड, महत्वाची बंदरे जैन धनाढ्य लोकांच्या घशात घातली जात आहेत. ते वाचवण्यासाठी मुंढेच पाहिजे असेही पत्रात म्हटले आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीपेक्षा उग्र चळवळीची ही ठिणगी ठरणार आहे हे मात्र नक्की असा इशार या पत्रात देण्यात आला आहे.



# पर्यटनासारखं दवाखान्यात येतात, तमाशा जास्त करतात

## चित्रा वाघ यांच्या दौऱ्यानंतर यशोमती ठाकूर संतापल्या



■ अमरावती (दै. संध्या)

शहरातील शासकीय स्त्री रुग्णालयात आगीच्या भीषण दुर्घटनेत तीन चिमुकल्यांचा जीव गेला. यापूर्वीही रुग्णालयात अशाप्रकारे आग लागून दुर्घटना घडल्या आहेत. अमरावती येथील दुर्घटनेनंतर मंत्री, आमदार, खासदार आणि विविध राजकीय पक्षाने नेते रुग्णालयाला भेट देऊन माहिती घेत आहेत. भाजप आमदार चित्रा वाघ यांनीही आज अमरावती येथील रुग्णालयास भेट देऊन पाहणी केली. तसेच, येथील असुविधांवरुन रुग्णालय प्रशासनावर संताप व्यक्त करत तुमच्यामुळे सरकार बदनाम होत असल्याचं म्हटलं. आाता, चित्रा वाघ यांच्या दौऱ्यानंतर काँग्रेस नेत्या तथा मंत्री यशोमती ठाकूर यांनी भेटी देणाऱ्या नेत्यांवरच टीका केली आहे. काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी नेतेमंडळींच्या अमरावती रुग्णालय दौऱ्याला पर्यटन संबोधत संतप्त प्रतिक्रिया दिली. या सरकारची काय नाटकं सुरू आहेत हे समजत नाही. पर्यटनसारखं दवाखान्यात येत आहेत आणि तमाशा जास्त करीत आहे. कुठही सरकार काम करत नाही. सरकारचा धाक याठिकाणी राहिला नाही, अशा शब्दात यशोमती ठाकूर यांनी चित्रा वाघ यांच्या दौऱ्यानंतर आरोप आणि टीका केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अजूनपर्यंत पोहोचले नाहीत, त्यांचा पाणीपुरी खाण्याचा व्हिडिओ त्याठिकाणी येतो. हनुमान गढीला 121 कोटी दिले पण नऊ कोटी रुपये जिल्हा स्त्री रुग्णालयाला दिले नाही. इथं येऊन उगाच नाटकं, आरडाओरडा बंद करा. रोज कोणी हिरो हिरोईनसारखं, कोणी लोकप्रतिनिधी येणार, सरकार काम करत आहे हे सांगणार, पण सरकारचं अमरावतीकडे दुर्लक्ष आहे ही वास्तविकता असल्याचंही यशोमती ठाकूर यांनी म्हटलं. दरम्यान, तत्पूर्वी चित्रा वाघ यांनी रुग्णालयास भेट देऊन येथील आगीच्या घटनेबाबत आधी जिल्हाधिकारी आणि नंतर वैद्यकीय अधिकारी यांच्याशी चर्चा केली. भंडारा घटनेनंतर सगळ्या रुग्णालयाला फायर ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. 25 जून रोजी पहिलं पत्र दिलं, 30 जूनला आणि 22 ऑगस्ट रोजी आम्ही व्हिजिट केली असे PWD वाले म्हणताय. पण, वैद्यकीय अधिकारी म्हणतात याठिकाणी कोणीच आले नाही, तेव्हा PWD वाले म्हणतात की स्त्री रुग्णालयवाले स्टॉप देत नाहीत.

### कर्मचाऱ्यांनी ३६ बालकांचा जीव वाचवला

कोणती तरी कंपनी आहे एएफ इलेक्ट्रीक वायर ओके आहे म्हणतात. मग, हे कसं घडलं. 400 बेडचं हे रुग्णालयात आहे, याचं फायर ऑडिट होणे आवश्यक आहे. कोणत्याही डॉक्टरांनी लेखी दिलेलं नाही की आम्हाला हे व्हेंटिलेटर नको, आम्हाला हे नको. आम्हाला शिलर कंपनीचे व्हेंटिलेटर नको असं पण कोणी लिहून दिलं नाही. त्यामुळे सरकारने सांगितले म्हणून दिले, असं झालेलं नाही, असे म्हणत सरकारची बाजूही वाघ यांनी घेतली. जेव्हा घटना घडली तेव्हापासून पालकमंत्री यंत्रणेच्या संपर्कात आहेत, इथल्या चार कर्मचाऱ्यांनी 36 बालकांचा जीव वाचवला. तीन नवजात बालकांना खासगी रुग्णालयातून डिस्चार्ज झाले आहे, त्यांची प्रकृती चांगली आहे.

# अन्यथा न्यायालयाचा अवमान समजून तुरुंगात पाठवू

## *हायकोर्टानं FDA ला झापलं, म्हणाले, तुम्ही स्वत:ला देव समजता का?*

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यभरात तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाईचा धडाका लावला असून शासकीय संस्था आणि नामवंत संस्थांवरही एफडीएने कारवाईचा बडगा उगारल्याचं पाहायला मिळालं. यापूर्वी, नवी मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेललाही एफडीएने बंद केले होते, त्यानंतर हॉटेल मालकाने उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर अखेर न्यायालयाच्या आदेशाने त्या हॉटेलचा रद्द परवाना सुरू करण्यात आला होता. आता, मुंबई क्रिकेट असोसिएशनने देखील एफडीएच्या कारवाईविरोधात न्यायालयात धाव घेतली. त्यावर, तुम्ही स्वत:ला देव समजता का? असा सवाल उच्च न्यायालयाने एफडीएला विचारला आहे. मुंबई उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर एमसीएच्या बीकेसी येथील रेस्टॉरंटवर केलेल्या कारवाईवेळी न्यायालयाने एफडीएला धारेवर धरले. MCA वरील कारवाईदरम्यान एफडीएने कायदेशीर स्थितीचा पूर्णपणे अभ्यास न करता "अनावश्यक घाई" का केली? तुमचा विभाग आणि अधिकाऱ्यांना खडसावून थकलोय, अशा शब्दात उच्च न्यायालयाने एफडीएला सुनावलं. यापूर्वी न्यायालयाने हे प्रकरण पुन्हा विचारात घेण्याचे निर्देश दिले असतानाही एफडीएने "व्यावहारिक ऐवजी केवळ तांत्रिक दृष्टिकोन" स्वीकारल्याचे सांगत न्यायालयाने एफडीएकडून देण्यात आलेल्या परवाना रद्दचे आदेश रद्द केले. तसेच, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील एमसीएच्या आवारातील खाद्यगृहे पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा केला. त्यामुळे, मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि अन्न व औषध प्रशासन यांच्यातील वादात MCA ला मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला. दरम्यान, आम्ही तुमच्या विभागाला आणि अधिकाऱ्यांना वारंवार फटकारुन कंटाळलो आहोत. त्यामुळे, आता कठोर आदेश देण्याची वेळ आली. संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध न्यायालयाचा अवमान केल्याची कारवाई करू, त्यांनी आम्हाला पटवून द्यावे, अन्यथा तुरुंगात जावे," अशा शब्दात न्यायालयाने एफडीएला फटकारले आहे. तसेच, कायदेशीर स्थितीचा पूर्णपणे विचार न करता एफडीएने अनावश्यक घाई का केली? असा सवालही खंडपीठाने उपस्थित केला. आपल्या विभागाला निराशावादी वाटू नये म्हणून आम्ही कितीवेळा समजूत घालण्याचा आणि समतोल साधण्याचा प्रयत्न करायचा? 'तलवारीने डास का मारले जात नाहीत?' असे आपण का म्हणतो? तुम्ही देव आहात, तुम्ही काहीही करू शकता असं तुम्हाला वाटतं का? असा सवालही उच्च न्यायालयाने एफडीएला विचारला.



### हायकोर्टाकडून एमसीएला दिलासा

बीकेसी येथील MCA क्लबच्या किचनवर FDA ने घातलेली बंदी न्यायालयाने उठवण्याचे आदेश दिले आहेत. 20 ऑगस्ट रोजी FDA ने केलेल्या पहिल्या तपासणीत MCA क्लबच्या किचनला 110 पैकी 87 गुण मिळाले होते. त्यानंतर 25 ऑगस्टला पुन्हा निरीक्षणाचे आदेश देण्यात आले. 27 ऑगस्ट रोजी झालेल्या दुसऱ्या तपासणीत किचनचे गुणांकन वाढून 95 झाले. तरीही कारवाई सुरू राहिल्याने MCA ने न्यायालयात धाव घेतली. सुनावणीदरम्यान समाधानकारक गुणांकन असताना किचनवर बंदी घालण्याच्या FDAच्या निर्णयावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. अखेर न्यायालयाने किचनवरील बंदी तातडीने उठवण्याचे आदेश दिल्याने MCA ला दिलासा मिळाला आहे.

# गोकुळची दहीहंडी महायुतीच फोडणार

■ मुंबई (दै. संध्या)

यंदा गोकुळ दूध संघाची दहीहंडी महायुतीच फोडणार असल्याचा विश्वास भाजपचे खासदार धनंजय महाडीक यांनी व्यक्त केला. 25 विरुद्ध शून्य अशा मतांनी गोकुळवर महायुतीची पुन्हा सत्ता येणार असल्याचा दावा महाडिकांनी केलाय. त्याचबरोबर काँग्रेस नेते आमदार सतेज पाटलांवर देखील त्यांनी टीका केलीय. त्यांच्या समविचारी आघाडीकडं उमेदवार नसल्याने ते सध्या सर्वांच्याच भेटीगाठी घेत असल्याचा टोला महाडिकांनी लगावला. आता सतेज पाटील समविचारी पक्ष म्हणून गोकुळच्या राजकारणात फिरत आहेत, तर यापूर्वी त्यांची समविचारी आघाडी कुठे गेली होती? असा सवाल खासदार धनंजय महाडिक यांनी केला. आमचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष, आमदार आणि संचालकाची त्यांनी भेट जरी घेतली तरी दोन्ही बाजूंनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेटीगाठी सुरुच राहणार असल्याचे महाडिक म्हणाले. विधान सभेप्रमाणे यंदा गोकुळ वर सुद्धा महायुतीचीच सत्ता राहणार असल्याचे महाडिक म्हणाले. मी यापूर्वी देखील सांगितलं होतं आत्ता सुद्धा सांगतो राजकारणात कोणी कुणाचा कायमचा शत्रू नसतो किंवा कोणी कोणाचा कायमचा मित्र नसतो असे धनंजय महाडिक म्हणाले. गोकुळ निवडणुकीच्या अनुषंगाने सतेज पाटील आणि आम्ही एकत्र येण्याची कोणतीही चिन्ह नाहीत, अशी प्रतिक्रिया खासदार धनंजय महाडिक यांनी दिली. दरम्यान, गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने कोल्हापुरातील राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# संपादकीय

## जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष कधी?

आजच्या महाराष्ट्रासह देशाच्या परिस्थितीकडे पाहिले, तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते घडामोडींचा वेग वाढला आहे; मात्र सामान्य माणसाच्या प्रश्नांची उत्तरे अजूनही तितक्याच वेगाने मिळत नाहीत. राजकीय आरोप-प्रत्यारोप, आंदोलनांची तीव्रता, हवामानातील अनिश्चितता, शेतीसमोरील संकट आणि वाढत्या महागाईचा दबाव या सगळ्यांच्या केंद्रस्थानी शेवटी सामान्य नागरिकच आहे. यंदाचा मान्सून देशासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. उपलब्ध अहवालानुसार २००९ नंतरचा हा सर्वात कमजोर मान्सून ठरण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, पावसाची तूट शेती उत्पादनावर परिणाम करू शकते. महाराष्ट्रातही काही भागांत पावसाअभावी सोयाबीनसारखी पिके करपण्याची चिंता शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. शेतकऱ्याच्या शेतात पाऊस कमी आणि राजकारणात आश्वासनांचा पाऊस अधिक, अशी परिस्थिती निर्माण होणे ही लोकशाहीसाठी चांगली बाब नाही. शेतकऱ्याला भाषणे नकोत; त्याला वेळेवर पाणी, वीज, पीकविमा, नुकसानभरपाई आणि बाजारभावाची हमी हवी आहे. हवामान बदलाचे संकट आता भविष्यातील विषय राहिलेला नाही. ते आज शेताच्या बांधावर उभे आहे. दुसरीकडे, अन्नधान्य आणि भाजीपाल्याच्या किमतींचा दबाव कायम आहे. रिझर्व्ह बँकेच्या अलीकडील अहवालात ऑगस्टमध्ये अन्नपदार्थांच्या किमतींमध्ये व्यापक वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. जुलैमध्ये किरकोळ महागाई ४.४५ टक्क्यांवर पोहोचली असून अन्नमहागाई ५.५२ टक्के होती. महागाईचा अर्थ केवळ आकडेवारीतून समजत नाही. घरातील किराणा वाढलेल्या बिलातून, विद्यार्थ्यांच्या फीमधून, प्रवासाच्या खर्चातून आणि महिन्याच्या शेवटी रिकाम्या राहणाऱ्या पाकिटातून तिची खरी किंमत कळते. त्यामुळे महागाई नियंत्रणात असल्याचे सांगताना सामान्य कुटुंबाच्या प्रत्यक्ष जीवनमानाचाही विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातही सत्ताधारी आघाडीतील मतभेद पुन्हा चर्चेत आले आहेत. विविध खात्यांतील हस्तक्षेप आणि निर्णयांवरून सत्ताधारी घटकांमध्ये नाराजी असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले आहे. आरक्षणाचा प्रश्न हा केवळ राजकीय मुद्दा नाही; तो सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार आणि संधींच्या समानतेशी जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे कोणत्याही समाजाच्या भावनांना राजकीय फायद्यासाठी कुरवाळण्याऐवजी सरकारने कायदेशीर चौकटीत, पारदर्शकपणे आणि सर्व घटकांना विश्वासात घेऊन कायमस्वरूपी तोडगा शोधण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रासमोर अनेक प्रश्न एकाच वेळी उभे आहेत शेतकरी, रोजगार, महागाई, शिक्षण, वाहतूक, शहरांतील पायाभूत सुविधा, पर्यावरण आणि सामाजिक सलोखा. या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी राजकीय संघर्षच केंद्रस्थानी राहिला, तर लोकशाहीचा खरा उद्देश हरवण्याची शक्यता आहे. पुण्यातील ध्वनिप्रदूषणाबाबत न्यायालयीन निर्देशांची अंमलबजावणी न झाल्याचा आरोप करत अवमान याचिका दाखल झाल्याची बाबही याच संदर्भात महत्त्वाची आहे. कायदे आणि न्यायालयीन आदेश कागदावर असणे पुरेसे नाही; त्यांची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. आजच्या काळात सरकारची खरी कसोटी निवडणुकीतील घोषणांमध्ये नाही, तर रस्त्यावरचा नागरिक किती सुरक्षित आहे, शेतकरी किती सक्षम आहे, तरुणाला रोजगाराची संधी किती उपलब्ध आहे आणि सामान्य कुटुंबाचा खर्च किती नियंत्रणात आहे, यात आहे. राजकारण हे सत्तेसाठी असले, तरी सत्ता ही जनतेसाठी असली पाहिजे. आंदोलन हा लोकशाहीचा अधिकार आहे, पण त्यातून तोडगा निघणे हे त्याचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. आणि विकासाच्या घोषणा कितीही मोठ्या असल्या, तरी त्याचा लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचला तरच त्या घोषणांना अर्थ प्राप्त होतो.

## संस्कृत सुभाषित

आरोग्यं विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुले जन्म ।
स्वाधीनता च पुंसां महदैश्वर्यं विनाप्यर्थे:।।

अर्थ : आरोग्य, विद्वत्ता, सज्जनाबरोबर मैत्री, चांगल्या कुळात जन्म आणि प्रत्येक गोष्टीत स्वावलंबन या गोष्टी म्हणजे महान ऐश्वर्य आहे.

## गुरु वचन

### देश आणि काळाचे ज्ञान

देश आणि काळाच्या संबंधात जे आपले ज्ञान आहे. ते खूपच मर्यादित आणि थोडे आहे. आपण देशाच्या खोलवर जात नाही त्याचे मूळ समजून घेण्याचा प्रयत्न करत नाही. वेळ किंवा काळ काय आहे. त्याचे मूळ स्वरुप काय आहे. याला खरोखरच मनात उतरवल्याने देश आणि काळाचे आपले अपूर्ण ज्ञान काही अंशी पूर्ण होऊ शकते आणि आपले विचार सीमित देश आणि परिमित काळाच्या मागे जाऊ शकतात. विचार करण्याची गोष्ट ही आहे की, आपण युग, वर्ष, महिना, दिवस आदींना काळ समजतो तो काळ हा प्रकृतीपासून निर्मित आहे. आणि प्रकृतीच्या गर्भात आहे. परंतु महाप्रलयाच्या वेळी जेव्हा हे कार्यरुप संपूर्ण जगात आपल्या कार्यरुप प्रकृतीमध्ये मिळून जाते. त्यावेळी देश-काळाचे रुप काय असते. ते देशकाळ प्रकृतीचे कार्य असते. त्यामुळे या प्रश्नावर विचार केला तर असे वाटते की, अशक्त देश काळ ज्या अशक्त देश काह ज्या प्रकृतीरुप देश काळात मिळून जातात. प्रकृती रुप देश काळतर प्रकृतीचे स्वरुप आहे. आणि या प्रकृतीचे जे अधिष्ठान आहे. अर्थात ही प्रकृती आपले कार्य संपूर्ण जड दृश्यवर्ग मिळाल्यानंतरच ज्यामध्ये ही स्थिती असते. ते अधिष्ठान प्रकृतीचे कार्य असू शकत नाही. ते तर सर्वांचे पहिले कारण आहे आणि सर्वांचे पहिले कारण एकमात्र विज्ञानान्धन परमात्मा हेच आहे. त्या विज्ञानन्दन ती साम्यावस्थामध्ये राहते आणि कधी विकासाला प्राप्त होते. ज्यावेळी ती साम्यावस्थमध्ये त्यावेळी आपले कार्य समस्त जड दृश्यवर्गाला आपल्यात लीन करुन परमात्माच्या कोणत्याही एक अंशी स्थिती असते. आणि ज्यावेळी तोच परमात्माला सकारात्मकतेमुळे विषमता प्राप्त होते. त्यावेळी परमात्म्याची देखरेख संसाराचे सृजनत्व असते.

## उपदेशकथा

### शोधक नजर

स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर चक्रवर्ती राजगोपालाचारी (राजाजी) कलकत्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयास भेट देण्यासाठी आले होते. ग्रंथालयाच्या दर्शनी कक्षात थोर भारतीय स्त्री-पुरुषांच्या तसबिरी भिंतीवर लावलेल्या आहेत. राजाजी त्यांच्या शोधक नजरेने ग्रंथालय पाहात होते. कुणा जवळच्या माणसाने त्यांच्या तसबिरीकडे बोट दाखविलं, ते थंडपणे म्हणाले, 'आज सकाळीच तर नाही टांगली ती तसबीर?' तल्लख बुद्धिमत्तेचे वरदान लाभलेले ते वयोवृद्ध मुत्सद्दी होते. टाचणीनं फुगा फोडावा, तसा त्यांनी विभूतिपूजक दुनियेचा पोकळ बडिवार तर उघड केलाच पण रामायण-म हाभारताचे जनसामान्यांसाठी सुगम अनुवाद करणाऱ्या आपल्या अंत:करणातली विरक्ती किती सच्ची आहे याचाही प्रत्यय दिला.

कथा उपदेश : बुद्धिमता आणि अनुभवाने कोणताही पोकळ बडिवार फोडता येतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:वणिज २१:१७:२६ |
| ३० ऑगस्ट २०२६ | सूर्य:सिंह |
| रविवार | चन्द्र:मीन |
| विक्रम संवत्- २०८२ | हिजरी सन् - १४४८ |
| श्रावण शके | मुस्लिम मास - रबिलावल |
| संवत्- १९४८ | तारीख - १६ |
| संवत्सर - पराभवनाम | विशेष |
| अयन- दक्षिणयन | सूर्याचा पूर्वाफाल्गुनी |
| मास- श्रावण | नक्षत्रप्रवेश वाहन: गाढव |
| ऋतु- सौर शरद | केशवदत्त महाराज |
| कृष्ण पक्ष | पुण्यतिथी - सोनगिर (धुळे) |
| तिथि:द्वितीया ०९:३७:२० | शिवचरण महाराज |
| नक्षत्र:उत्तराभाद्रपद २७:४४:३१+ | पुण्यतिथी - अकोला |
| योग:शूल २७:४५:१३+ | आदित्य पूजन |
| करण:गर ०९:३७:२० | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7 | | 1 | 4 | 6 | | 3 |
| | | 1 | 5 | | | | | |
| 3 | | 4 | | | | 9 | | 5 |
| 4 | 9 | | 7 | 2 | | | 3 | |
| 1 | | | | 8 | | | | 6 |
| | 7 | | | 5 | 1 | | 8 | 9 |
| 6 | | 9 | | | | 3 | | 8 |
| | | | | | 5 | 1 | | |
| 5 | | 3 | 1 | 9 | | 7 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०५३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 6 | 9 | 5 | 1 | 2 | 8 | 3 |
| 5 | 9 | 1 | 8 | 3 | 2 | 7 | 6 | 4 |
| 3 | 8 | 2 | 6 | 4 | 7 | 9 | 5 | 1 |
| 8 | 6 | 5 | 7 | 1 | 9 | 4 | 3 | 2 |
| 2 | 1 | 9 | 4 | 8 | 3 | 5 | 7 | 6 |
| 7 | 4 | 3 | 5 | 2 | 6 | 1 | 9 | 8 |
| 1 | 5 | 8 | 3 | 7 | 4 | 6 | 2 | 9 |
| 6 | 2 | 7 | 1 | 9 | 8 | 3 | 4 | 5 |
| 9 | 3 | 4 | 2 | 6 | 5 | 8 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३९ - लंडनमधून ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तू, दस्तऐवज आणि लहान मुले बाहेर पाठविण्यास सुरुवात.
- १९४२ - कॅनडात सक्तीच्या सैनिकभरतीस सुरुवात.

### राष्ट्रीय

- १७७३ - नारायणराव पेशवे यांचा पुण्याच्या शनिवारवाड्यामध्ये खून झाला.
- १९७५ - पहिले बालकुमार साहित्यसंमेलन भा. रा. भागवत यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे भरविण्यात आले.

### जन्म

- १३३४ - पीटर पहिला, कॅस्टिलचा राजा.
- १३७७ - शाहरुख, पर्शियाचा राजा.
- १५६९ - जहांगीर, अकबर बादशाहचा मुलगा, चौथा मुगलसम्राट, अनारकलीचा सलीम.
- १८५६ - कार्ल डेव्हिड टॉल्म रुंग, जर्मन भौतिकशास्त्रज्ञ.
- १८३१ - अर्नेस्ट रुदरफोर्ड,अणूंच्या रचनेबद्दल महत्त्वाचे संशोधन करणारे शास्त्रज्ञ.
- १९१८ - बाळशास्त्री हरदास, साहित्याचार्य.
- १९३० - वॉरेन बफे, अमेरिकन उद्योगपती.
- १९३४ - बाळु गुप्ते, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९४२ - परवेझ सज्जाद, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.

### निधन

- ११५८ - सांचो तिसरा, कॅस्टिलचा राजा.
- १४२८ - शोको, जपानी सम्राट.
- १४८३ - लुई अकरावा, फ्रांसचा राजा.
- १६१९ - शिमाझु योशिहिरो, जपानी सामुराई.
- १९४९ - आर्थर फील्डर, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९९१ - पू. ज. देवरस, सर्पमित्र.

## : SMS :

2. Doctor: Tumhe kya problem hai?
Patient: Sab mujhe ignore karte hain
Doctor: Agla patient bulao.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.१ | २२ |
| अहमदनगर | ३०.७ | २२.५ |
| अकोला | ३५.१ | २५.१ |
| अमरावती | ३२.७ | २५ |
| बीड | ३५.९ | २६.३ |
| भंडारा | ३१.८ | २५.८ |
| बुलढाणा | ४३.८ | ३०.७ |
| चंद्रपूर | ३६.२ | २६.१ |
| चेन्नई | ४०.५ | ३० |
| नवी दिल्ली | ४६ | ३५.३ |
| धुळे | ३३.६ | २४.८ |
| गोंदिया | ३२.३ | २५.५ |
| जळगाव | ३५.३ | २५.२ |
| कोल्हापूर | २९.७ | २२.७ |
| लातूर | ३१.६ | २३ |
| मुंबई | ३४ | २९.९ |
| नागपूर | ३२ | २५ |
| नांदेड | ३४.७ | २५.१ |
| नंदूरबार | ३० | २४.३ |
| नाशिक | ३० | २३.२ |
| पुणे | २७.१ | २२ |
| पंढरपूर | ३४.२ | २३.५ |
| सातारा | ३०.८ | २२.५ |
| सांगली | ३१.९ | २३ |
| सोलापूर | ३४.३ | २३.७ |
| वर्धा | ३५.२ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व बौद्धिक चळवळीचे नेतृत्व आपण कराल. त्यातून आपली प्रतिमा उंचावेल.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम जुन्या आठवणी, नव्या मित्रांची संगत यातून भरीव कामगिरी करू शकाल.

**मिथुन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व घरात कुटुंबियांच्या तब्येती व काही विचित्र प्रश्न यातून सफाईने मार्ग काढावा लागेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर आयुष्याला वळण देणारे ठरावेत असे प्रस्ताव आपले उत्पन्नही वाढविणारे ठरतील.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व कोणत्याही वादविवादात मध्यस्थी करू नका. शब्दप्रयोग व पैसा यांचा वापर विचारपूर्वक करा.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा : उत्तर घरात काही मंगलकार्ये ठरतील. कार्यक्रमानिमित्त घरात पाहुण्यांची वर्दळ राहील.

**तुळ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व मैत्रिणीसह होणाऱ्या गप्पातून ज्ञानात भर पडेल. काही वैचारिक चर्चा हितकारक ठरतील.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम घरातले मंगल वातावरण, नशीबाची अनुकूल साथ हे सर्व कसे चांगले जमून येणार आहे.


**धनु :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व अनाठायी खर्च टाळा. खर्च करताना आपण काही अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालत नाही ना याची काळजी घ्या.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व घरगुती आजारपण, नाराज शेजारी, पाहुण्यांचे मुक्काम आणि स्वत:ची कामाची घाई यातून वेळ काढावा लागेल.

**कुंभ :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : उत्तर प्रवासातून चांगले अनुभव आपल्या व्यवसायात बदल करायला लावतील. संततीशी वादाचे प्रसंग येतील.

**मीन :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : उत्तर नोकरीच्या अपेक्षा असणाऱ्यांना अपेक्षित अशी नोकरी मिळेल. बदल लाभदायक ठरतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५४



### आडवे शब्द

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दुष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

### उभे शब्द

१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

उभे उत्तर : १.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.परोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५ अ.रास

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे





### ज्योती कदम, स्वाती निम्हण, सुनीता लांजेकर यांना आदर्श माता पुरस्कार जाहीर

**पुणे : दैनिक संध्या**

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् च्यावतीने आठवा आदर्श माता पुरस्कार ज्योती कदम, स्वाती निम्हण, सुनीता लांजेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता न-हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळ्याला विधानपरिषद सदस्य आमदार नीलम गोऱ्हे, सामाजिक कार्यकर्त्या ममता सपकाळ, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. साडी, श्रीफळ, पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराचे यंदा आठवे वर्ष असून संस्थेच्या खजिनदार सुरेखा सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला आहे. अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या ज्योती कदम या मातोश्री आहेत. तर, नगरसेवक सनी निम्हण यांच्या मातोश्री स्वाती निम्हण या दुस-या पुरस्कारार्थी आहेत. तसेच तिस-या पुरस्कारार्थी सुनीता लांजेकर या सिने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या मातोश्री आहेत. विविध क्षेत्रातील या दिग्गज व्यक्तिमत्वांना घडवून समाजसेवेचे धडे दिल्याबद्दल कृतज्ञता म्हणून या मातांना गौरविण्यात येणार आहे. प्रत्येक यशस्वी व्यक्तीमागे त्यांच्या आईचे अमूल्य योगदान असते. लहानपणापासून केलेले संस्कार, योग्य शिक्षण आणि मार्गदर्शन यामुळे प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठू शकतो. त्यामुळे समाजातील अशाच यशस्वी व्यक्तींच्या मातांचा सन्मान संस्थेतर्फे केला जात आहे. हा कार्यक्रम विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### भारतात एअरबीएनबीवरील 'जेन झी'च्या यजमानपदात जवळपास ४०% वाढ

**पुणे : दैनिक संध्या**

भारतातील जेन झीच्या फक्त प्रवासाची पद्धतच वेगळी नाही तर ते एअरबीएनबीवर यजमान (होस्ट) बनून जगासाठी आपली दारे उघडत आहेत. नवीन एअरबीएनबी माहितीनुसार, २०२६ च्या पहिल्या सहामाहीत भारतातील जेन झी यजमानांची संख्या वार्षिक तुलनेत जवळपास ४०% नी वाढली आहे. भारतात एअरबीएनबीवर सामील होणाऱ्या प्रत्येक पाच नवीन यजमानांपैकी जवळपास दोन यजमान १८-२९ वयोगटातील असून त्यातून यजमानपद स्वीकारणाऱ्या तरुण भारतीयांच्या एका नवीन पिढीच्या उदयाचे संकेत मिळत आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला एअरबीएनबीच्या 'नेव्हर द सेम' अहवालात असे आढळून आले होते की भारतातील जेन झीने देशाच्या प्रवासाच्या पद्धतीत मूलभूत बदल घडवून आणला आहे. नवीन माहितीतून असे दिसते की हीच पिढी आता त्या अनुभवाच्या दुसऱ्या बाजूला आहे आणि आपल्या घरांची दारे पाहुण्यांसाठी उघडून भारताच्या प्रवासी नकाशावर स्वतःचा ठसा उमटवत आहेत. जसजसा हा समुदाय वाढत आहे, तसतशी आतिथ्याद्वारे कमाई करणाऱ्या तरुण भारतीयांची संख्याही वाढत आहे. २०२६ च्या पहिल्या सहामाहीत एअरबीएनबीद्वारे जेन झी यजमानांच्या कमाईत वार्षिक तुलनेत ६०% पेक्षा जास्त वाढ झाली आहे.

### पुणे विभाग शिक्षक मतदारसंघासाठी कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी

**पुणे : दैनिक संध्या**



पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीने (टीडीएफ) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा टीडीएफचे पुणे विभाग समन्वयक कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना पुरस्कृत उमेदवार म्हणून अधिकृत घोषणा केली आहे. उमेदवारांच्या मुलाखती आणि निर्धारित निकषांनुसार केलेल्या मूल्यमापनानंतर टीडीएफच्या निवड समितीने गावडे यांच्या उमेदवारीचा निर्णय घेतला. महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडी ही १९६५ मध्ये स्वर्गीय आमदार तात्यासाहेब सुळे यांनी स्थापन केलेली राज्यातील जुनी शिक्षक संघटना आहे.

# हातमाग, स्थानिक कारागिरांसाठी केंद्र सरकारचा पुढाकार

## प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांचे प्रतिपादन; 'निरुपाज् येवला पैठणी अँड सिल्क सारीज'च्या दालनाचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

"भारताच्या विविध भागात वेगवेगळ्या प्रकारचे कापड प्रसिद्ध आहे. स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि भारतीय हातमाग उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये राष्ट्रीय हातमाग दिन, 'एमएसएमई' योजना, कारागिरांसाठी कर्जसुविधा आणि पारंपरिक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत," असे प्रतिपादन संसदीय समितीच्या अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले.



'निरुपाज् येवला पैठणी अँड सिल्क सारीज' या येवला पैठणीच्या अग्रगण्य ब्रँडच्या पुण्यातील भव्य दालनाचे उद्घाटन मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. ठाण्यानंतर 'निरुपाज्'ने आता पुण्यात मध्यवर्ती भागात भांडारकर रस्त्यावर शानदार दालन सुरू केले आहे. उद्घाटनावेळी निरुपाज्'च्या संस्थापिका निरुपा तायडे, त्यांच्या मातोश्री वंदना वझारे, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, ईशम तायडे, दिलीप खैरे, धिरज वझारे, गणेश डोके, महेश गायकवाड, योगिता गायकवाड, तुषार खैरे, सारंग मगर, वैशाली डोके, रोहित डोके आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "साडी हा महिलांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. तसेच भारतात साड्यांचा व्यवसाय मोठा असून, साड्या विणणे ही एक कला आहे. या कलेला प्रोत्साहन देण्याचे काम केंद्र सरकार सातत्याने करत आहे. पुण्यातील महिला चोखंदळ आहेत. त्यांना साड्यांची चांगली पारख आहे. 'निरुपाज्'च्या साड्या या स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन देऊन तयार करण्यात आल्या आहेत, ही कौतुकाची बाब आहे. येत्या काळात रेल्वेस्थानकांवर वस्त्रदालने, स्थानिक हस्तकला उत्पादने यांना विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न सुरू आहे. या उपक्रमांमुळे पारंपरिक कला आणि व्यवसायांचे जतन होण्याबरोबरच ते पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे."

प्रत्येक साडीचा पोत, फिनिशिंग याकडे विशेष लक्ष दिलेले असल्याने येथील साड्या वेगळ्या आहेत. अस्सल हातमागावर विणलेल्या आणि हाताने कारागिरी केलेल्या या साड्या आपण कारागिरांकडून तयार करुन घेतल्या आहेत. मराठमोळ्या साड्यांची समृद्ध परंपरा जपणारे 'निरुपाज् सारीज' ठाणे आणि मुंबईत तर प्रसिद्ध आहेच. पण आता पुण्यातही नव्याने ओळख निर्माण करण्याच्या दृष्टीने हे दालन महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. येत्या ७ दिवसांत जे ग्राहक दालनात येऊन साडी खरेदी करतील त्यांना साड्यांवर विशेष सूट देणार असल्याचे निरुपा तायडे यांनी सांगितले.

निरुपा तायडे म्हणाल्या, "या दालनात ग्राहकांना येवल्याची अस्सल पैठणी आणि सिल्कच्या विविध प्रकारच्या साड्यांचे कलेक्शन पाहता आणि खरेदी करता येणार आहे. निरुपाज् साडीचे पुण्यातील हे पहिलेवहिले दालन असून, याठिकाणी दोन हजारांपासून सात लाख रुपयांपर्यंतच्या अस्सल हातमाग साड्या उपलब्ध आहेत. पारंपरिक येवला पैठणी, बनारसी, सिल्क, पटोला अशा पारंपरिक साड्यांबरोबरच जरदोसी वर्क, मोती वर्क केलेल्या नव्या पद्धतीच्या साड्यांचेही उत्तम कलेक्शन पाहता येणार आहे.

अभिनेत्री प्राजक्ता माळी 'निरुपाज्'ची ब्रँड अँबेसेडर असून, नुकतीच कान्स चित्रपट महोत्सवाच्या रेड कार्पेटवर प्राजक्ताने 'निरुपाज्'ची साडी परिधान केली होती. याशिवाय केतकी माटेगावकर, अभिजित खांडकेकर यांसारख्या बऱ्याच सेलिब्रिटींनी येथून साडी खरेदीला पसंती दिलेली आहे. त्यामुळे सेलिब्रिटींमध्येही 'निरुपाज्' विशेष प्रसिद्ध आहे.

## कोनार्कसह बॅटरी, चार्जिंग आणि वाहन आरोग्य तंत्रज्ञानाचे अनावरण

### ५ हजारांहून अधिक एथरप्रेमींच्या उपस्थितीत चौथ्या कम्युनिटी डेचा उत्साहात सोहळा

■ पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीची इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक एथर एनर्जीने चौथ्या एथर कम्युनिटी डेचे आयोजन करत इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील पुढील पिढीच्या तंत्रज्ञानाची झलक सादर केली. देशभरातील सुमारे ५ हजार रायडर्स, ईव्ही उत्साही आणि एथर समुदायातील सदस्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात कंपनीने वाहन, बॅटरी, चार्जिंग आणि मालकी अनुभवाशी संबंधित चार महत्त्वपूर्ण घोषणा केल्या.



२०१६ मध्ये अवघ्या ३० ते ४० लोकांच्या छोट्या समुदाय भेटीपासून सुरू झालेला एथर कम्युनिटी डे आज कंपनीचा सर्वात मोठा वार्षिक समुदाय कार्यक्रम बनला आहे. यंदाच्या कार्यक्रमात कोनार्क, एथर टू हेल्थ, पाचव्या पिढीचे बेडरॉक बॅटरी प्लॅटफॉर्म आणि अथरनोड या चार महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानांची घोषणा करण्यात आली. या घोषणांमध्ये सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते एथरच्या नव्या कोनार्क इलेक्ट्रिक स्कूटरने. कंपनीच्या नव्या ईएल प्लॅटफॉर्मवर आधारित हे पहिले उत्पादन असून भारतीय ग्राहकांच्या दैनंदिन वापराच्या गरजा लक्षात घेऊन त्याची रचना करण्यात आली आहे. कोनार्कमध्ये आरामदायी राइड, स्थिरता, रेंज, सर्व्हिसेबिलिटी आणि मालकीची सोय यावर विशेष भर देण्यात आला आहे. ही स्कूटर एस आणि झेड या दोन प्रॉडक्ट लाइन्समधील सहा व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध असेल. या व्हेरिएंट्समध्ये १०० ते २०० किलोमीटरपर्यंतची IDC रेंज देण्यात आली आहे. कोनार्कमध्ये १० हजार किलोमीटरचे सर्व्हिस इंटरव्हल देण्यात आले आहे. त्यामुळे बहुतांश वापरकर्त्यांसाठी वर्षातून एकदा सर्व्हिसिंग करणे पुरेसे ठरणार आहे. वेअर-अँड-टीअर कॉम्पोनंट्सपर्यंत सहज पोहोचता यावे, यासाठीही वाहनाची रचना करण्यात आली आहे.

नवीन स्कूटरमध्ये अ‍ॅडव्हान्स्ड इलेक्ट्रॉनिक ब्रेकिंग सिस्टम, मॅजिककी, ऑटोपॉप आणि एअरवॉक यांसारखी फीचर्स देण्यात आली आहेत. तसेच ऑनबोर्ड चार्जिंग आणि कॉम्बाइन्ड चार्जिंगच्या सुविधेमुळे घरगुती चार्जिंगचा वेळ कमी करण्यास मदत होणार आहे. एथरने पाचव्या पिढीच्या बेडरॉक बॅटरी प्लॅटफॉर्मचीही घोषणा केली. या बॅटरीमध्ये ब्रीचसेन्स हे नवीन रिअल-टाइम सुरक्षा तंत्रज्ञान देण्यात आले आहे.

## हसरतेंचा चौथा सीझन पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

■ पुणे (दै. संध्या)

हंगामा ओटीटी वरील हसरतें ही सीरिज चौथ्या सीझनसह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. महिलांच्या इच्छा, धैर्य आणि स्वतःचे आयुष्य नव्याने घडवण्याच्या प्रवासावर आधारित ही सीरिज यावेळी त्यांच्या खासगी आयुष्यातील भावनिक संघर्षांवर अधिक प्रकाश टाकते. पहिल्या तीन सीझनला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर, या नव्या सीझनमध्ये महिलांच्या मनातील आणि बंद दरवाजांआड सुरू असलेल्या संघर्षांची अधिक खोलवर कथा दाखवण्यात येणार आहे. शांत आणि संयमी दिसणाऱ्या महिलांच्या मनात असलेली इच्छा, बंडखोरी आणि स्वतःशीच सुरू असलेली झुंज या सीझनमध्ये पाहायला मिळणार आहे. या सीझनमध्ये एकमेकांशी जोडलेल्या सहा कथा दाखवण्यात आल्या आहेत. या कथांमधून कर्तव्य आणि स्वतःच्या इच्छांमध्ये अडकलेल्या महिलांचा प्रवास पाहायला मिळतो. स्वतःवर लादलेले नियम मोडण्याची, आतापर्यंत मनात दडवून ठेवलेल्या भीतीचा सामना करण्याची आणि आपल्या इच्छा, भावना व्यक्त करून आयुष्य मनापासून जगण्याचा अधिकार पुन्हा मिळवण्याची त्यांची धडपड या कथांमधून दिसून येते.




## महावितरणच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू

■ पुणे (दै. संध्या)

थेऊर (ता. हवेली) येथील महावितरण कार्यालयात कंत्राटी सेवेत काम करत असणाऱ्या कामगाराचा विजेच्या तीव्र धक्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज सायंकाळी सव्वाचारच्या सुमारास घडली आहे. अशोक किसन जवळकर (वय-५२, रा. आळंदी म्हातोबाची, ता. हवेली) असे विजेच्या धक्क्याने मृत्यू पावलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव आहे. त्यामुळे आळंदी म्हातोबाची आणि कुंजीरवाडी परिसरात प्रचंड हळहळ व्यक्त होत असताना, महावितरणच्या कारभाराविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

## दावे-क्लेम्स हेच विश्वासाचे आहे चलन - डॉ. पोरस पेश्तोतॉन

■ पुणे (दै. संध्या)

विमा हे आज दिलेले एक वचन आहे. ते अनेक वर्षांनंतर उद्भवणाऱ्या गरजेसाठी दिले जाते. परंतु, या वचनाची खरी कसोटी फक्त एकाच क्षणी लागते: विमा हप्ता भरला जातो तेव्हा. त्यामुळेच, विमा हप्ता भरण्याच्या प्रक्रियेकडे केवळ एक कार्यात्मक मापदंड म्हणून न पाहता, जीवन विमा कंपनीसाठी विश्वासाचे चलन म्हणून पाहिले पाहिजे. तसेच, एखादी विमा कंपनी आपला मूलभूत उद्देश पूर्ण करत आहे की नाही, याचे हे सर्वात स्पष्ट मोजमाप आहे.

AXIS MAX LIFE INSURANCE

भारताची विमा बाजारपेठ विस्तारत असल्यामुळे या प्रश्नाचे महत्त्व वाढत आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये जीवन विमा उद्योगाने ८.८६ लाख कोटी रूपयांचा प्रीमियम गोळा केला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ६.७३ टक्क्यांनी अधिक होता. तरीही, जीवन विम्याचा प्रसार जीडीपीच्या २.७ टक्क्यांपर्यंत घसरला.

अ‍ॅक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड चे मुख्य अंडररायटर डॉ. पोरस पेश्तोतॉन म्हणाले की अ‍ॅक्सिस मॅक्स लाईफमध्ये आमचा वैयक्तिक मृत्यू दाव्यांचा पेड रेशो सलग पाच वर्षे ९९% पेक्षा जास्त राहिला आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील ९९.३४ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तो सातत्याने सुधारून ९९.८ टक्के झाला आहे. त्यामुळे तो या उद्योगातील अग्रगण्य क्लेम्स पेड रेशोपैकी एक आहे. केवळ आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्येच आम्ही १,६४१ कोटी रूपयांचे २०,५२९ वैयक्तिक मृत्यू दावे निकाली काढले. तथापि, महत्त्वाचा मुद्दा ही आकडेवारी नाही. तर आकडेवारी काय दर्शवतो, हे महत्त्वाचे आहे. ती म्हणजे दिलेली वचने पाळण्याची संस्कृती.

दावे अशा प्रकारे ब्रँडची ओळख निर्माण करतात, जी जाहिरातूनही होईलच असे नाही. कठीण काळात ज्या विमा कंपनीने त्यांना आधार दिला, ती कुटुंबे लक्षात ठेवतात. ते हा अनुभव नातेवाईक, मित्र आणि सहकाऱ्यांसोबत शेअर करतात. अशा बाजारपेठेत जिथे आर्थिक निर्णय अनेकदा वैयक्तिक शिफारशींवरून घेतले जातात, तिथे प्रत्येक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित केलेला दावा एक शक्तिशाली आणि विश्वासार्ह ब्रँड कथा बनतो.

थोडक्यात सांगायचे तर विश्वास फक्त शब्दांनी निर्माण होऊ शकत नाही. तो कृतीतून, एका वेळी एक कुटुंब आणि एका दाव्याद्वारे कमावला जातो. त्यामुळे दावे हे केवळ आर्थिक व्यवहारांपेक्षा अधिक आहेत. हे ते क्षण असतात जेव्हा विम्याला त्याचा अर्थ प्राप्त होतो, दिलेले वचन सत्यात उतरते आणि विश्वास मूर्त स्वरूपात येतो.

## लोकप्रिय मालिकांच्या कथानकात गुगल सर्चचा एआय मोड

### झी आणि गुगलची अनोखी भागीदारी

■ पुणे (दै. संध्या)

भारतभरात काही सर्वांत अर्थपूर्ण नाती कहाण्यांमधून निर्माण होतात. टेलीव्हिजनवरील मालिका प्रेक्षकांच्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. या मालिकांमधील महत्त्वाकांक्षी व्यक्तिरेखांची स्वप्ने, संघर्ष आणि जीवनप्रवास अनेकदा प्रेक्षकांना आपलेसे वाटतात. प्रेक्षक आणि कथाकथन यांच्यातील याच अनोख्या नात्यामुळे झी आणि गूगल यांनी एकत्र येत भारतात प्रथमच फिक्शन-आधारित एआय सर्च एकीकरणाची सुरुवात करत आहेत. या उपक्रमाद्वारे झी टीव्हीची लोकप्रिय मालिका 'गंगा माई की बेटियाँ' यांच्या कथाविश्वात गूगल सर्च एआय मोडला समाविष्ट करण्यात येणार आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सुरू होणारा हा उपक्रम पारंपरिक ब्रँड प्लेसमेंटच्या चौकटीपलीकडे जात गूगल सर्च एआय मोडला मालिकेतील प्रमुख व्यक्तिरेखांच्या प्रवासाचा नैसर्गिक भाग बनवणार असून त्यामुळे कथाकथन सहज बनेल. दैनंदिन जीवनातील आपलेसे वाटणारे क्षण आणि सर्वसामान्यांच्या समस्या यांमध्ये गूगल सर्च एआय मोड त्याला विचारलेले गुंतागुंतीचे प्रश्न कसा समजून घेतो आणि आत्मविश्वासाने निर्णय घेण्यासाठी त्यांना हवी असलेली माहिती शोधण्यास कसा मदत करतो याचा अनुभव मिळणार आहे.

या सहकार्यामध्ये झीच्या 'डिलफ्लुएन्सर मोमेंट्स' या विशेष संकल्पनेचा फायदा उठवण्यात आला आहे, जो एक अनोखा उपक्रम असून यात ब्रँडची तत्त्वे वास्तविक तसेच नैसर्गिक कथाकथनात गुंफत विविध स्क्रीन्स आणि फॉर्मेट्सवर प्रेक्षकांशी अधिक प्रभावी संवाद साधला जातो. प्रेक्षकांचा सर्वाधिक भावनिक संबंध त्यांच्या विश्वासातील कथा, पात्रे आणि प्रसंगांशी निर्माण होतो आणि याच विश्वासावर आधारित 'डिलफ्लुएन्सर मोमेंट्स' ब्रँड्सना कथानकाचाच अर्थपूर्ण भाग बनण्याची संधी देतात . याची सुरुवात झी टीव्हीच्या विश्वासार्ह काल्पनिक मालिका विश्वातून होत असून त्याचा विस्तार विविध संपर्क माध्यमांपर्यंत केला जातो. या सहकार्यामध्ये गूगल सर्चचा एआय मोड हा अशाच प्रसंगांचा नैसर्गिक भाग म्हणून समोर येतो आणि कथानकातील व्यक्तिरेखा विविध आव्हानांचा सामना करताना, नवीन



शक्यता शोधताना आणि पूर्ण माहितीसह निर्णय घेताना त्यांना मार्गदर्शन करतो. हे सर्व कथेशी सुसंगत आणि नैसर्गिक वाटेल अशा पद्धतीने सादर करण्यात आले आहे.

या भागीदारीचा भाग म्हणून झी आणि गूगल यांनी 'गंगा माई की बेटियां' मालिकेत 'स्नेहा'ची भूमिका साकारणाऱ्या अमनदीप सिद्धूचा सहभाग असलेली एक विशेष ब्रँड फिल्मही सादर केली आहे. पडद्यामागील सहज आणि नैसर्गिक दृश्यांवर आधारित असलेल्या या फिल्मची सुरुवात अमनदीप आणि तिची मेकअप आर्टिस्ट आरती (राजसी भावे) यांच्यातील साध्याशा संवादाने होते. जेव्हा आरती स्वतःचे ब्युटी सलून सुरू करण्याचे तिचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी निघणार असल्याचे सांगते, तेव्हा अमनदीपला आश्चर्य आणि उत्सुकता वाटते. जशी त्यांची बातचीत पुढे सरकते तसे व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले अनेक प्रश्न, अनिश्चितता आणि महत्त्वाचे निर्णय तिने कशा प्रकारे हाताळले याबद्दल आरती सांगते.

या संपूर्ण प्रवासात तिच्यासोबत एक विश्वासार्ह मार्गदर्शक होता गूगल सर्च एआय मोड. उबदार, सहज आणि प्रेरणादायी संवादाद्वारे ही फिल्म एआय मोड संदर्भ कशाप्रकारे समजून घेतो, जटिल परिस्थिती सोपी कशी करतो आणि लोकांना हवी असलेली माहिती मिळवून देण्यासाठी कसा मदत करतो हे प्रभावीपणे दाखवून देते.

## लोकमान्य जीवन गौरव पुरस्कार उल्हास पवार यांना जाहीर

### *पुणे परिवारच्या वतीने विविध गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांचा सन्मान*

■ पुणे (दै. संध्या)

पुणे परिवारच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा लोकमान्य जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ नेते आणि उर्वरित पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.४५ वाजता सदाशिव पेठेतील स.प. महाविद्यालयाच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये होणार आहे. यावेळी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे परिवारचे अ‍ॅड. प्रताप परदेशी, विनायक घाटे आणि शिरीष मोहिते यांनी दिली.



यंदाच्या पुरस्कार सोहळ्यास कृषिमंत्री दत्ता भरणे, आमदार हेमंत रासने, विजयकुमार कुवळेकर, जन्मेजयराजे भोसले, पुणे शहराचे सह पोलीस आयुक्त संजय दराडे, कृषिकेश रावले, सुनील रासने, अण्णा थोरात, महेश सूर्यवंशी आदी उपस्थित राहणार आहेत. आदर्श गणेशोत्सव कार्यकर्ता पुरस्कारासाठी नारायण पेठ माती गणपती मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष परेश हराळे, देशप्रेमी मित्र मंडळ, एरंडवणेचे कार्यकर्ते मंदार बलकवडे, विद्यानगरी मित्र मंडळ, धनकवडीचे अध्यक्ष प्रतीक कुंभार, अखिल रामनगर मित्र मंडळ, येरवडाचे अध्यक्ष राकेश चव्हाण आणि श्री गजानन मित्र मंडळ ट्रस्ट, तुळशीबागचे अध्यक्ष सागर दहिभाते यांची निवड झाली आहे.

गणेश सेवा पुरस्कारासाठी मानस गोईलकर तसेच तृतीयपंथीय सर्व वादकांचे शिखंडी वाद्यपथक यांची निवड करण्यात आली आहे. गणराया गुणगौरव विशेष सन्मानासाठी पराग प्रभाकर बंगाळे आणि येरवडा मध्यवर्ती कारागृहातील पुंडलिक वासुदेव खलोरकर यांची निवड झाली आहे.

पुणे परिवारच्या वतीने मागील २१ वर्षांपासून लोकमान्य जीवन गौरव पुरस्कार, आदर्श गणेशोत्सव कार्यकर्ता पुरस्कार आणि गणेश सेवा पुरस्कार देण्यात येत आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे काम संस्थेच्या वतीने केले जाते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### 1 Finance ने मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून नियुक्ती

**मुंबई : दै. संध्या**

वैयक्तिक आर्थिक सल्ला आणि वेल्थ-टेक क्षेत्रात काम करणाऱ्या 1 Finance या कंपनीने मंजू ढाके यांची पार्टनर म्हणून नियुक्ती केली आहे. 1 Finance कडे सध्या 17,000 कोटीं रुपयांपेक्षा जास्त ॲसेट्स अंडर ॲडव्हाइस (AUA) आहेत. पार्टनर म्हणून त्या पुण्यातील कंपनीच्या फायनान्शियल प्लॅनिंग सेंटरचे नेतृत्व करतील. तसेच पुण्यातील ग्राहकांसाठी आर्थिक सल्ला सेवा अधिक मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे असेल. मंजू ढाके यांना विमा, वितरण, आर्थिक सल्ला आणि वित्तीय सेवा क्षेत्रात 20 वर्षांहून अधिक अनुभव आहे. त्यांनी अनेक व्यवसाय आणि सेवा शून्यापासून उभ्या केल्या आहेत. व्यवसायाची रणनीती, उत्पादन आणि नियमांचे पालन (कंप्लायन्स), भागीदारी, वितरण आणि ग्राहककेंद्रित आर्थिक सल्ला या क्षेत्रांचा त्यांना चांगला अनुभव आहे. त्यांनी आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ, एचडीएफसी लाइफ, एल अँड टी फायनान्स, सुशील इन्शुरन्स ब्रोकर्स तसेच फिनटेक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम केले आहे.1 Finance मध्ये त्यांनी विमा सल्ला सेवा सुरू करून ती मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच ग्राहकांना त्यांच्या विमा आणि आर्थिक संरक्षणाबाबत योग्य निर्णय घेता यावा यासाठी संशोधनावर आधारित मार्गदर्शक पद्धती तयार करण्यात त्यांनी योगदान दिले आहे. त्यांच्या कामामध्ये टर्म आणि हेल्थ इन्शुरन्सचे स्कोअरिंग आणि रँकिंग, मॉर्टेलिटी प्रोटेक्शन गॅप आणि सरेंडर व्हॅल्यू कॅल्क्युलेटर यांचा समावेश आहे. याशिवाय, विम्याचे मूल्यांकन करताना ग्राहकांचे मत, अनुभव आणि भावना यांचाही विचार केला जातो. मंजू ढाके यांनी 'इन्शुरन्स मेड सिम्पल' हे पुस्तकही लिहिले आहे. या पुस्तकाचा उद्देश विम्याची माहिती सामान्य लोकांना आणि कुटुंबांना सोप्या भाषेत समजावून सांगणे हा आहे. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये सीएमए (कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडिया), एम.कॉम (मास्टर ऑफ कॉमर्स), एफआयआयआय (फेलोशिप फ्रॉम इन्शुरन्स इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया) आणि एनआयएसएम सिरीज-एक्स-ए व सिरीज-एक्स-बी प्रमाणपत्रे यांचा समावेश आहे.

### अडोबी इंडियाचा राज्य सरकारांसोबत सहयोग

**पुणे : दै. संध्या**

अडोबी या नाविन्यपूर्ण टूल्स आणि प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सर्जनशीलता, उत्पादकता व वैयक्तिक ग्राहक अनुभवांना सक्षम करणाऱ्या जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनीने शाळांमध्ये डिजिटल सर्जनशीलता आणि एआय कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दिल्ली, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गोवा, आसाम, बिहार आणि तामिळनाडू येथील राज्य सरकारांसोबत धोरणात्मक उपक्रमाची घोषणा केली आहे. राज्यांसोबत स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारांचा (एमओयू) भाग म्हणून, अडोबी हजारो सरकारी शाळांना अडोबी एक्स्प्रेस फॉर एज्युकेशन मोफत उपलब्ध करून देईल. हे डिजिटल मीडिया ॲप आहे, जे विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट्समध्ये गुंतवून ठेवून त्यांचे शैक्षणिक निकाल सुधारण्यास आणि भविष्यासाठी उपयुक्त कौशल्ये विकसित करण्यास मदत करते. या उपक्रमामुळे भारतातील के-१२ (बालवाडी ते १२ वी) श्रेणीतील अडोबी ची पोहोच देशभरातील शाळांमधील ७.८ दशलक्ष विद्यार्थी आणि शिक्षकांपर्यंत वाढली आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून, विद्यार्थी आणि शिक्षकांना अडोबी डिजिटल ॲकॅडमी अंतर्गत डिजिटल सर्जनशीलता आणि एआय कौशल्य-विकास अभ्यासक्रम देखील मिळेल. यामुळे सर्जनशील समस्या निवारण, डिजिटल स्टोरीटेलिंग आणि एआयच्या मदतीने कंटेंट तयार करण्यामध्ये प्राविण्य मिळवता येईल, जे राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या भविष्य-सज्ज शिक्षणाच्या दृष्टिकोनाला पुढे नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. वर्गखोलीतील अध्यापनात डिजिटल सर्जनशीलतेचा समावेश कसा करावा याचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले जाईल, तर विद्यार्थी शाळेतील प्रकल्प आणि सर्जनशील अभिव्यक्तीसाठी अडोबी एक्स्प्रेसचा वापर करतील.

### गणेशोत्सवासाठी अधिकृत वीज जोडणी घ्या

**मुंबई : दै. संध्या**

यंदाचा गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेची योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच उत्सव कालावधीत केवळ अधिकृत वीज जोडणीच (वीज कनेक्शन) घ्यावी, असे आवाहन 'महावितरण'कडून करण्यात आले आहे. उत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना वा दुर्घटना घडू नये याची खबरदारी घ्यावी. आगमन आणि विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्ते तसेच गल्लीबोळांतील विजेच्या तारांची (वीजवाहिन्या) उंची लक्षात घेऊनच गणेशमूर्तीची उंची व रथाची रचना निश्चित करावी. त्याचप्रमाणे मंडप आणि रोषणाईसाठी वीज संचाची मांडणी करताना सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जावे. अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच हे काम करून घ्यावे.

# बजाज जनरल इन्श्युरन्सची 'माय फॅमिली कम्प्लीट'ची घोषणा

## पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्य म्हणून कव्हरेज देणारी भारतातील पहिली हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी

**■ नवी दिल्ली(दै. संध्या)**

भारतातील आघाडीच्या खासगी जनरल इन्श्युररपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड) आज 'माय फॅमिली कम्प्लीट' हा एक अभिनव हेल्थ इन्श्युरन्स प्रॉडक्ट सुरू केल्याची घोषणा केली आहे. या प्रॉडक्ट द्वारे कुटुंबाच्या व्याख्येत पाळीव कुत्रे आणि मांजरे यांचाही समावेश करण्यात आला आहे. पहिल्यांदाच अशा प्रकारे सादर करण्यात आलेल्या या प्लॅनद्वारे, माणसांसाठी आणि पाळीव प्राण्यांसाठी वेगवेगळ्या पॉलिसी घेण्याची गरज कमी करून एकात्मिक प्लॅनमध्ये कव्हरेज देण्यात आले आहे. पाळीव प्राण्यांना विमाधारक कुटुंबीय म्हणून कव्हर देणारा हा प्लॅन एकाच हेल्थ प्रोटेक्शन फ्रेमवर्क अंतर्गत सर्वांना एकत्रित कव्हरेज देतो. या प्लॅनमध्ये ₹5 लाख ते ₹5 कोटी पर्यंत सम इन्श्युअर्डचे पर्याय आणि पाच वर्षांपर्यंतचा सुविधाजनक कालावधी उपलब्ध करून देते. तसेच यामध्ये नुकसानभरपाई आणि लाभ - आधारित पेआऊट यांचा समतोल साधला आहे.

'माय फॅमिली कम्प्लीट'हा कुटुंबातील प्रत्येक सदस्याला, 18 वर्षे आणि त्यावरील प्रौढांना, 3 महिन्यांपासून ते 30 वर्षांपर्यंतची अवलंबित मुलांना आणि 3 महिन्यांची पाळीव कुत्री किंवा मांजरे, ज्यांच्यासाठी कमाल वयाची कोणतीही मर्यादा नाही, यांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. या प्लॅनमध्ये इन-पेशंट हॉस्पिटलायझेशन, रूम रेंट, रोड आणि पेट ॲम्ब्युलन्स सर्व्हिसेस, प्री- आणि पोस्ट-हॉस्पिटलायझेशन खर्च, डोमिसिलियरी केअर, आधुनिक उपचार पद्धती, आयुष हॉस्पिटलायझेशन (माणसांसाठी), अवयव दात्याचा खर्च आणि फॅमिली व्हिजिट रिएम्बर्समेंट यांसाठी कव्हरेज मिळते. कस्टमर्सना सम इन्श्युअर्डच्या अनलिमिटेड रिइन्स्टेटमेंटचा लाभ देखील मिळतो. म्हणजेच हॉस्पिटलायझेशनचे कव्हरेज वापरले गेल्यानंतर ते प्रत्येक वेळी पुन्हा रिस्टोअर होते, 100% पर्यंत संचयी बोनस, मोतीबिंदू उपचार कव्हरेज आणि निश्चित आरोग्य लाभ मिळतात, ज्यामध्ये विमाधारक व्यक्ती किंवा पाळीव प्राणी दीर्घकाळ हॉस्पिटलमध्ये दाखल असल्यास सम इन्श्युअर्डच्या 1 टक्के इतका रिकव्हरी लाभ दिला जातोमुख्य कव्हरेज सोबतच, 'माय फॅमिली कम्प्लीट' मध्ये पाळीव प्राण्यांसाठी खास- लाभ देण्यात आले आहेत. जसे की पाळीव प्राणी हरवल्यास त्याची जाहिरात देण्यासाठी रिएम्बर्समेंट आणि शोध घेण्यासाठी रिवॉर्ड, पाळीव प्राण्याच्या पालकाचे हॉस्पिटलायझेशन झाल्यास आपत्कालीन पाळीव प्राणी निवास आणि इन्श्युअर्ड पाळीव प्राण्यामुळे झालेल्या दुखापत, मृत्यू किंवा प्रॉपर्टीच्या नुकसानीसाठी थर्ड- पार्टी लायबिलिटी कव्हर यांचा समावेश आहे. या सर्व सुविधांमुळे माणसे आणि पाळीव प्राणी या दोघांचीही सर्वांगीण काळजी घेता येते. ज्यामुळे हे प्रॉडक्ट खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक हेल्थ इन्शुरन्स सोल्यूशन ठरते 'माय फॅमिली कम्प्लीट' मध्ये अनेक पर्यायी कव्हर देखील उपलब्ध आहेत. ज्यामुळे कुटुंबांना त्यांच्या बदलत्या गरजांनुसार प्लॅनमध्ये आवश्यक ते बदल करता येतात. ग्राहक, माणसे आणि पाळीव प्राणी दोघांसाठी एअर ॲम्ब्युलन्स कव्हर, गंभीर आजार आणि ॲक्सिडेंट मल्टिप्लायर, डबल सम इन्शुअर्ड लाभ, आणि मूल किंवा पाळीव प्राण्यांची पिल्ले जन्माला आल्यावर एकरकमी रक्कम देणारा बंडल ऑफ जॉय लाभ यांसारख्या वैशिष्ट्यांद्वारे वर्धित संरक्षणाची निवड करू शकतात. अतिरिक्त रायडर्समध्ये विदेशात नियोजित आणि आपत्कालीन हॉस्पिटलायझेशनसाठी ग्लोबल कव्हर, स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी करण्यासाठी कन्झ्युमेबल्स प्लस, वार्षिक मर्यादेशिवाय एका क्लेमसाठी हेल्थ लिमिटलेस, तसेच एनआरआय आणि ओसीआयसाठी प्रीमियममध्ये डिस्काउंट सह NRInsure आणि ठराविक स्टेप काउंट पूर्ण केल्यावर रिन्युअल वर वॉक टू विन डिस्काउंट यांचा समावेश आहे.

### सुविधांमुळे प्रॉडक्टची सर्वसमावेशकता वाढते

पॉ- प्रॉमिस सारख्या पाळीव प्राण्यांसाठीच्या खास पर्यायामध्ये इन्श्युअर्ड पाळीव प्राण्याचा मृत्यू झाल्यास किंवा तो हरवल्यास नवीन पाळीव प्राणी अडॉप्ट करण्यासाठी आर्थिक मदत देतात तसेच एक्सटेंडेड पेट स्टे आणि गंभीर आजारांसाठी लाँग टर्म केअर कव्हर यांचा समावेश आहे. या सुविधांमुळे प्रॉडक्टची सर्वसमावेशकता आणखी वाढते. तसेच कुटुंबात, लाँग-टर्म पॉलिसी आणि लॉयल्टी लाभ यांवर मिळणाऱ्या सवलतींमुळे हा प्लॅन अधिक परवडणारा बनतो. हे पर्यायी रायडर्स आणि डिस्काउंट एकत्रितपणे 'माय फॅमिली कम्प्लीट' ला केवळ सर्वसमावेशकच नव्हे, तर कस्टमाईज करता येणारा प्लॅन बनवतात. त्यामुळे कुटुंबांना त्यांच्या जीवनशैली, हेल्थकेअर प्राधान्ये आणि पाळीव प्राण्यांसोबतच्या नात्यानुसार स्वतःचा हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन तयार करता येतो.

या घोषणेबाबत बोलताना बजाज जनरल इन्श्युरन्सचे एमडी आणि सीईओ, डॉ. तपन सिंघेल म्हणाले, "आमच्यापैकी अनेकांसाठी पाळीव प्राणी केवळ सोबती नसतात, तर ते कुटुंबाचा एक अविभाज्य घटक असतात. आपल्या आयुष्यात त्यांची उपस्थिती आपण साजरी करतो. त्यांची काळजी घेतो, ते आजारी पडल्यावर त्यांची चिंता करतो आणि कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणेच त्यांच्यासाठीही गोष्टींची इच्छा बाळगतो. जेव्हा पाळीव प्राणी कुटुंब असतात, तेव्हा त्यांचे आरोग्य आणि कल्याण हे स्वाभाविकपणे कुटुंबाच्या हेल्थकेअर गरजांचा देखील एक भाग बनते.

'माय फॅमिली कम्प्लीट' द्वारे आम्ही ही गरज पूर्ण करण्यासाठी पाळीव प्राण्यांनाही फॅमिली हेल्थ इन्श्युरन्समध्ये समाविष्ट करत आहोत. भारतात प्रथमच हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसी अंतर्गत, पाळीव कुत्रे आणि मांजरे यांना कुटुंबाचा भाग म्हणून कव्हर करता येणार आहे. त्यांच्या गरजा लक्षात घेऊन हेल्थकेअर आणि पाळीव प्राण्यांसाठी खास लाभ या प्लॅनमध्ये देण्यात आले आहेत. समाज आणि आजच्या कुटुंबांच्या जीवनशैलीनुसार इन्श्युरन्स मध्येही बदल होणे गरजेचे आहे.

कुटुंबातील प्रत्येक सदस्याला आवश्यक ती काळजी आणि सन्मानाने जीवन जगण्याची संधी मिळायला हवी. आणि आमचा विश्वास आहे की, कुटुंबाचा भाग असलेल्या आपल्या पाळीव प्राण्यांनाही हे लागू झाले पाहिजे. 'माय फॅमिली कम्प्लीट' मध्ये सर्वसमावेशक हेल्थ प्रोटेक्शन सह पाळीव प्राण्यांसाठी, विचारपूर्वक तयार केलेले लाभ देण्यात आले आहेत. त्यामुळे आजच्या कुटुंबांच्या हेल्थकेअर गरजा आणि ते आपल्या पाळीव प्राण्यांची कुटुंबातील सदस्य म्हणून घेत असलेली काळजी यांच्याशी इन्श्युरन्स अधिक सुसंगत बनतो."

'माय फॅमिली कम्प्लीट' द्वारे बजाज जनरल इन्श्युरन्स हेल्थ प्रोटेक्शनची कव्हरेज पारंपरिक कुटुंबरचनेच्या पलीकडे विस्तार करुन पाळीव प्राण्यांनाही इन्श्युअर्ड सदस्य म्हणून समाविष्ट करत आहे. वाढता हेल्थकेअर खर्च, कुटुंबे आणि त्यांच्या पाळीव प्राण्यांमधील भावनिक नाते आणि आधुनिक जीवनशैलीनुसार सर्वसमावेशक व कस्टमाईज करता येणाऱ्या इन्श्युरन्स उपाययोजनेची वाढती गरज या प्लॅनद्वारे लक्षात घेण्यात आली आहे.

# पुरंदर तालुक्याचा एकच उत्पादित ब्रँड डेव्हलप केल्यास मार्केटिंग करणे सोपे होईल

**■ पुरंदर (दै. संध्या)**

महिलांनी मसाले लोणचे पापड पारंपारिक व्यवसाय करण्यापेक्षा वेगवेगळ्या व्यवसाय करण्यावर भर देण्यात यावा. तसेच महिलांनी एकत्र मिळून व्यवसाय केला तर खर्च कमी होऊन उत्पन्न वाढेल त्याचप्रमाणे प्रभागाचे किंवा तालुक्याचे एकच उत्पादन असेल तर त्याचा ब्रँड डेव्हलप करून मार्केटिंगसाठी सोपे होईल असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्या रूपालीवहिनी झेंडे यांनी केले. सासवड (ता. पुरंदर)येथील जयदीप मंगल कार्यालयात गुरुवार दिनांक २० ऑगस्ट रोजी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान अंतर्गत कऱ्हामाई महिला प्रभागसंघाची (दिवे गराडे जिल्हा परिषद गट) वार्षिक सर्वसाधारण सभा सासवड या ठिकाणी पार पडली. यावेळी जिल्हा परिषद सदस्या रुपालीवहिनी अमोल झेंडे, पंचायत समिती सभापती सभापती अमित भाऊसाहेब झेंडे, उपसभापती प्रविण जगताप, पुणे जिल्हा परिषद माजी सदस्या ज्योतीताई झेंडे,गटविकास अधिकारी अविनाश थोरात, संचालक पुणे संजय मांढरे, मंगेश माने, बँक ऑफ इंडिया बँक शाखा व्यवस्थापक सासवड सचिन दोलताडे, शिवसेना,पुरंदर तालुका महिला आघाडी अध्यक्ष वैशाली काळे आदी उपस्थित होते.प्रभाग संघ अध्यक्ष अलका बडदे, सचिव हेमलता खेडेकर, कोषाध्यक्ष वंदना गायकवाड, लिपिका दिपाली भोराडे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सपना करकंडे, तालुका व्यवस्थापक नंदा कुरडे, तालुका व्यवस्थापक गणेश किकले, महंतवीर घाडगे, समन्वयक रमेश भंडलकर, सागर ढाकणे, महमंद शेतसंदी, यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.


## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र.०२०/२६१२२४८५

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in

*ई-निविदा सूचना क्रमांक ३३ सन २०२६-२०२७*

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे १ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४८५/२६१२२४१४) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा. बां. विभाग मुंबई परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ आणि शासन सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २०/५/२०२१ आणि शासन निर्णय क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक ३१/०८/२०२३ आणि शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र. क्र. १०४/ इमा-२, दिनांक १४/२/२०२५ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून पुणे परिसरातील **रू. ५०.०० लक्षपेक्षा जास्त व रू. १००.०० लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रकीय किंमतींचे** कामांसाठी **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा विक्री कालावधी तसेच सादर करावयाचा कालावधी | :- | दिनांक ३१/०८/२०२६ सकाळी १०.०० वा.ते दिनांक ०७/०९/२०२६ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत. |
| ऑनलाईन ई निविदा उघडणेचा कालावधी | :- | दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. ऑनलाईन उघडण्यात येतील. (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

सही/-
(प्रशांत शंकर खैरमोडे)
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक
बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

विमाका/पुणे/जाहिरात/137/2026-27



प्रपत्र-१

## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२५८१७५१७

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- buildingpune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक ८ सन २०२६-२०२७ (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, शिवकिर्ती, सदनिका क्र. जी ६/१ व ६/२. घोरपडी रोड, पुणे ४११००१ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| काम क्र. १ | शासकीय पशु पैदास प्रक्षेत्र, ताथवडे येथे कडबाकुट्टी यंत्रणा व गोठा क्र. १, २, ३ व ४ मध्ये दुरुस्तीची कामे करणे. | रु. ७६.१२ लक्ष |

ई निविदेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. ०२/०९/२०२६ ते दि. ०९/०९/२०२६ |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. ०९/९/२०२६ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. ११/०९/२०२६ वेळ १०.०० पासुन पुढे |

निविदा सूचनेबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. www.mahapwd.com (फक्त निविदा सुचना)
२. mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१ कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/२३०३/२०२६
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
शिवकिर्ती, सदनिका क्र. जी ६/१ व ६/२,
घोरपडी रोड, पुणे ४११००१
दि. २४/०८/२०२६

सही/-
(उ. सं. घावटे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
पुणे ४११ ००१.

*विमाका/पुणे/जाहि./139/2026-27*



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गणेश महादेव महाबरे व सुहास शिवलाल मुथियान रा. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२ येथे राहावयास असून, सदरची मिळकत आमचे अशिलानी कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व विसार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा यांनी आमचे अशिलास दिलेला आहे. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकती संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध कुलमुखत्यार, करारमदार, साठेखत, विसारपावती, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षिस, लोन, लीज, चोळी बांगडी, ताबा वहिवाट कोर्टकारवाई वगैरे असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत अस्सल कागदपत्रानिशी आमची खात्री पटवुन द्यार्वी व त्याची लेखी पोहोच द्यावी. तसे न केल्यास सदर मिळकती मध्ये असलेल्या हक्क त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन - तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर पैकी ग्रामपंचायत बारव (पाडळी) येथील व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील गाव बारव येथील शेतजमिन मिळकत. (जुना बारव हद्दीमधील गट नं. १४/३)

मौजे बारव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील खरेदी देणार यांचे नावाने खाते क्र. २८६३ अन्वये नोंद असलेली यांचे मालकीची संपुर्ण शेतजमिन.

| गट नं. | क्षेत्र हेक्टर - आर | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|
| १४/३ | ० - ३२ | ० - ४७ |

यापैकी खरेदी घेणार यांना विक्री करावयाचे क्षेत्र पुढीलप्रमाणे -

| गट नं. | क्षेत्र हेक्टर - आर | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|
| १४/३ पैकी | ० - १६ | ० - २३.५ |

येणेप्रमाणे मिळकती त्यातील सर्व तंगदभूत वस्तूसहित तसेच सदर जागेमध्ये येणेजाण्याचे व वहिवाटीचे हक्कासहित व इजमेंटरी राईट सह दरोबस्त मिळकतीत कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखून न ठेवता मिळकत.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस
दि : २९/०८/२०२६
ठिकाण : जुन्नर

श्री. तुषार दिनकर गायकवाड (ॲडव्होकेट)
बी. ए. एल. एल. बी
पत्ता - गणेश पेठ, जुन्नर ता.जुन्नर, जि. पुणे
संपर्क : ७९७२६०८७२



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले गाव मौजे वारजे ता.हवेली जि. पुणे येथील सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १अ/१अ/२अ/२० यांसी क्षेत्र ०० हेक्टर ९३ म्हणजेच ९३.०० चौ.मी म्हणजेच १००० चौ.फुट म्हणजेच ०१ आर लिहून देणार नामे श्री. संजय भगवान मुकटे यांचे क्षेत्र ०१ आर म्हणजेच ९२.९३ चौ.मी म्हणजेच १००० चौ.फुट जमीन मिळकत मालकी ताबे वहीवाटीची असून मुलकी रेकॉर्डला त्यांचे नावाची मालक म्हणून नोंद आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, तसेच प्रमिला विलास नेहे यांच्याकडून नामे श्री. संजय भगवान मुकटे यांनी दि. १५/०७/२००० रोजी खरेदीखताने विकत घेतली असून सदरहु दस्त सह दुय्यम निंबधक वर्ग -२ हवेली क्र.४, दस्त क्र.५६३८/२००० अन्वये नोंदणी कार्यालयात नोंदणी झाला आहे, त्यामुळे प्रस्तुतच्या जमीन मिळकतीचे मालक म्हणून नामे श्री. संजय भगवान मुकटे आहेत, सदर जमीन मिळकत क्लियर व मार्केटेबल टायटल आहे असा भरवसा लिहून देणार श्री. संजय भगवान मुकटे यांनी आमचे अशिलांना दिला आहे. आमच्या अशिलाकडून विसाराची रक्कम स्वीकारून परिशिष्टातील जमीन मिळकत विकत देण्याचे मान्य व कबुल केले आहे . तरी सदर जमीन मिळकतीवर किंवा तिचे भागावर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबध हरकत, क्लेम, अग्रहक्क, विसारपावती, मुखत्यार, तोंडी किंवा लेखी करार-मदार, कर्ज प्रकरण, कोर्ट प्रकरण, बँक जप्ती, रस्त्याचे हक्क, अतिक्रमण, गहाण, दान, लीन, लीज, अन्न वस्त्र, चोळीबांगडी इ. प्रकारे अगर इतर कोणत्याही प्रकारे अगर इतर कोणत्याही प्रकारे हरकत, क्लेम अथवा हक्क असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाचे आत पुराव्याचे अस्सल कागदपत्रानिशी पोहोच घेऊन लेखी हरकत घेऊन आमचे अशिलातर्फे आमची खात्री पटवावी अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास संबधितानी त्यांचे हक्क, अधिकार, हरकत सोडून दिले आहेत असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस..

परिशिष्ट

तुकडी पुणे पोट तुकडी ता. हवेली मे सब रजिस्टार हवेली, यांचे हद्दीतील तसेच ता.हवेली यांचे कार्यकक्षेतील गाव मौजे वारजे ता. हवेली जि.पुणे यांसी सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १अ/१अ/२अ/२० यांसी क्षेत्र ०० हे ०१ आर जमीन मिळकत यांसी चतु:सीमा :

पुर्वेस : याच सर्व्हे नं. मधील अंतर्गत १५ फुट रस्ता
दक्षिणेस : श्री राठोड व थावरे यांची मिळकत
पश्चिमेस : श्री थावरु धर्मा राठोड यांची मिळकत
उत्तरेस : श्री रामू सोमा चव्हाण यांची मिळकत

ठिकाण : पुणे
दि.२९/०८/२०२६

श्री. संजय भगवान मुकटे
(अशिलाची सही)

## थोडक्यात पण महत्वाचे



### माऊलींसाठी आली मुक्ताईची राखी; बंधुप्रेमाचा अनोखा सोहळा

**आळंदी : दैनिक संध्या**

रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त मुक्ताबाई संस्थान, मुक्ताईनगर यांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरात राखी अर्पण करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुक्ताबाई संस्थानचे अध्यक्ष रवींद्र भैया पाटील, ह.भ.प. रवींद्र महाराज हारणे, संदीप पाटील यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांना राखी अर्पण केली. तसेच श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या विश्वस्त ॲड. रोहिणीताई पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्षाबंधन हा प्रेम, विश्वास आणि नातेसंबंध दृढ करणारा सण असून, संतांच्या चरणी राखी अर्पण करून समाजात बंधुभाव, ऐक्य आणि अध्यात्मिक मूल्ये वृद्धिंगत व्हावीत, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### ‘पाणी साचल्यास संपर्क करा’ म्हणणारा फलकच अर्धवट;

**पिंपळे गुरव : दैनिक संध्या**

औंध, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, कासारवाडी येथून वल्लभनगर, पिंपरी, निगडीकडे जाण्यासाठी शंकरवाडी पुलाखालून जावे लागते. त्यामुळे या मार्गावर दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, पावसाळ्याच्या दिवसात या भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहनचालकांसह नागरिकांना धोका निर्माण होतो. पावसाळ्यात भुयारी मार्गात पाणी साचल्यास नागरिकांनी तातडीने संपर्क साधावा यासाठी प्रशासनाने शंकरवाडी येथील भुयारी मार्गावर मोठा सूचना फलक लावला आहे. मात्र या फलकावर पाणी भरल्यास खालील नंबरवर संपर्क करा, अशी ठळक सूचना देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात संपर्क करण्यासाठी एकही क्रमांक नमूद केलेला नाही. त्यामुळे प्रशासनाचा हा अजब कारभार समोर आला असून, हा सूचना फलक नक्की कोणासाठी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. भुयारी मार्गावर लावण्यात आलेल्या फलकावर पाणी साचल्यास संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याखाली ठेकेदार, एस.एस.ई./कार्य., ए.डी.ई.एन. आणि सेक्शन इंजिनिअर अशा संबंधित जबाबदार पदांचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, या पदांसमोर देण्यात येणारे भ्रमणध्वनी क्रमांकच गायब असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात भुयारी मार्गात अचानक पाणी साचल्यास वाहनचालक आणि नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण होऊ शकते. अशा वेळी प्रशासनाला माहिती देणे, मार्ग बंद करण्याची सूचना देणे किंवा मदत मागवणे आवश्यक असते. मात्र, संपर्कासाठी क्रमांकच उपलब्ध नसल्याने नागरिकांनी तक्रार करायची तरी कुठे असा प्रश्न निर्माण झाला आहे. 'सावधान'चा इशारा देणाऱ्या फलकावरच मदतीचा मार्ग बंद असेल, तर तो फलक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी किती उपयोगाचा? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. याच सूचना फलकावर पाणी लाल रेषेपर्यंत पोहोचल्यास पुलाचा वापर करू नये, असा सुरक्षेचा महत्त्वपूर्ण इशाराही देण्यात आला आहे. पाण्याची पातळी वाढल्यास भुयारी मार्गाचा वापर टाळणे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक आहे. मात्र, पाणी लाल रेषेपर्यंत पोहोचले किंवा त्यापूर्वीच भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणात पाणी साचले तर त्याची माहिती प्रशासनाला द्यायची कशी? फलकावर फोन करा असे सांगितले पण फोन करायचा कोणाला याचा पत्ताच नाही. त्यामुळे सुरक्षेच्या उद्देशाने लावण्यात आलेल्या या फलकाचीच विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

### भारतकेसरी ‘ओम्या’चा अखेरचा निरोप;

**वडगाव मावळ: दैनिक संध्या**



एक मुका प्राणीही संपूर्ण महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण करू शकतो, हजारो लोकांच्या डोळ्यांत अश्रू आणू शकतो, असा मावळ तालुक्यातील भारतकेसरी "ओम्या" ने गुरुवारी जगाचा निरोप घेतला आणि विशेषतः बैलगाडा क्षेत्रात पोकळी निर्माण करून गेला. "ओम्या".. मावळ तालुक्यातील वारंगवाडी येथील प्रसिद्ध बैलगाडा मालक म्हणून ओळख असलेले रामनाथ वारिंगे याचा बैल. वारिंगे परिवारच नव्हे तर बैलगाडा शौकिनांच्या या लाडक्या 'ओम्या' बैलाचे निधन झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. आपल्या लाडक्या ओम्याला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले होते. बैलगाडा क्षेत्रात मावळ तालुक्याचे नाव उंचावणाऱ्या "भारतकेसरी ओम्या" बैलास श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि अखेरचा निरोप देण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. रामनाथ वारिंगे यांनी 'ओम्या'वर केवळ शर्यतीतील बैल म्हणून नव्हे, तर आपल्या मुलाप्रमाणे जिवापाड प्रेम केले होते. त्याचे संगोपन, आहार आणि आरोग्याची ते विशेष काळजी घेत असत. ओम्याशी त्यांचे निर्माण झालेले जिव्हाळ्याचे नाते पाहून अनेकांना त्यांच्यातील भावनिक बंधाची अनुभूती येत असे. बैलगाडा शर्यतीच्या मैदानात 'ओम्या'ने आपल्या दमदार कामगिरीने आणि वेगाने अनेकांची मने जिंकली होती. त्यामुळे तो वारिंगे कुटुंबासह मावळातील बैलगाडा शर्यतप्रेमींच्या विशेष जिव्हाळ्याचा बनला होता. बैलगाडा शर्यत म्हटली की "ओम्या"ची बारी अनेकांच्या आठवणीत आहे. घाटात ओम्याची धाव पाहण्यासाठी हजारो बैलगाडा शौकीन गर्दी करत असत. फायनलमध्ये प्रतिस्पर्धी गाड्यांवर मात करत अवघ्या एक- दोन सेकंदांच्या फरकाने आघाडी मिळवत ओम्या आपल्या मालकाची मान अभिमानाने उंचावत असे. त्याचा वेग, धावण्याची शैली आणि रुबाब यामुळे त्याची बारी लागली की घाटावर शौकिनांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण होत असे. ओम्याने गेल्या नऊ वर्षांत बैलगाडा शर्यतींमध्ये एक नंबरची बारी मारून २ जेसीबी, ८ थार, १२ ट्रॅक्टर, ३ बोलेरो गाड्या, १७५ दुचाकी, २५ चांदीच्या गदा आणि तब्बल १५०० पेक्षा जास्त सन्मानचिन्ह मिळवली असून आपला मालक रामनाथ वारिंगे यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात चमकावले होते. इतकेच नाही तर आमदार महेश लांडगे यांनी आयोजित केलेल्या भव्य बैलगाडा शर्यतीमध्ये तब्बल १२०० बैलगाड्यांमध्ये भारत केसरी किताबही पटकावला होता.



# अमली पदार्थांविरुद्ध पिंपरी-चिंचवड पोलिसांचा एल्गार

■ पिंपरी(दै. संध्या)

अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यापासून युवकांना दूर ठेवण्यासाठी आणि शैक्षणिक परिसर अमली पदार्थमुक्त करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘कौशल्य – Drug Free Campus’ या अमली पदार्थविरोधी जनजागृती अभियानांतर्गत परिमंडळ-३ स्तरावरील विशेष जनजागृती कार्यक्रम अजिंक्य डी. वाय. पाटील कॉलेज, दिघी येथे उत्साहात पार पडला.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येत असून, युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे, व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच शैक्षणिक परिसर सुरक्षित आणि अमली पदार्थमुक्त करण्याचा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमास परिमंडळ-३चे पोलीस उपायुक्त मारुती जगताप, अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश जैन, उपकुलगुरू डॉ. एकनाथ खेडकर, मानसिक पुनर्वसन व मुक्ती केंद्र, भोसरी येथील डॉ. मोरे, एमआयडीसी भोसरी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुधाकर यादव, चाकण विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त योगेश रांजणकर, दिघी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन फटांगरे, तसेच परिमंडळ-३ अंतर्गत विविध पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अँटी नार्कोटिक सेलचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

कार्यक्रमाला परिमंडळ-३च्या हद्दीतील विविध शाळा आणि महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षकवृंद तसेच अजिंक्य डी. वाय. पाटील कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या अभियानाचे विशेष आकर्षण ठरला.

यावेळी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणामांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. व्यसनामुळे केवळ संबंधित व्यक्तीचे आरोग्यच धोक्यात येत नाही, तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होतो, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली.

विशेषतः युवकांनी मित्रपरिवार, सामाजिक माध्यमे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून येणाऱ्या अमली पदार्थांच्या प्रलोभनांपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले. कोणत्याही प्रकारच्या व्यसनाची सुरुवात लहान वाटत असली तरी त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे योग्य वेळी जागरूक होऊन मदत घेणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अँटी नार्कोटिक सेलच्या 7798100112 या हेल्पलाईन क्रमांकाची विद्यार्थी, शिक्षक आणि प्राचार्यांमध्ये व्यापक प्रसिद्धी करण्यात आली. अमली पदार्थांशी संबंधित कोणतीही माहिती, संशयास्पद बाब अथवा अवैध व्यवहाराची माहिती असल्यास नागरिकांनी या हेल्पलाईनवर संपर्क साधून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, विविध शैक्षणिक संस्थांचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण झाली.

‘कौशल्य – Drug Free Campus’ या अभियानाच्या माध्यमातून युवकांमध्ये अमली पदार्थांविरोधात प्रभावी जनजागृती करून सुरक्षित, निरोगी आणि व्यसनमुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. युवकांनी व्यसनमुक्त जीवनाचा संकल्प करून समाजालाही अमली पदार्थमुक्त करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

#### अमली पदार्थमुक्त कॅम्पससाठी सामूहिक जबाबदारी

शाळा आणि महाविद्यालये ही विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारी महत्त्वाची केंद्रे आहेत. त्यामुळे अमली पदार्थमुक्त शैक्षणिक परिसर निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षणसंस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतः अमली पदार्थांपासून दूर राहण्याबरोबरच आपल्या मित्रांनाही या व्यसनाच्या विळख्यात अडकण्यापासून परावृत्त करावे, असे आवाहन करण्यात आले. संशयास्पद हालचाली किंवा अमली पदार्थांशी संबंधित माहिती आढळल्यास ती तातडीने पोलिसांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

## आधुनिक विद्युत दाहिनी बसवण्याची मागणी

■ वाकड (दै. संध्या)



पुनावळे येथील स्मशानभूमीत आधुनिक गॅस किंवा विद्युत दाहिनी (चिमणी) बसविण्यात यावी, अशी मागणी युवासेना चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे उपशहरप्रमुख सागर शिंदे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पुनावळे गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक येत असतात. मात्र, येथे आधुनिक दाहिनीची सुविधा उपलब्ध नसल्याने पारंपरिक पद्धतीने लाकडावर अंत्यसंस्कार करावे लागतात. त्यामुळे पर्यावरणाचे प्रदूषण होत असून परिसरातील नागरिकांना तसेच स्मशानभूमीलगतच्या सोसायट्यांमधील रहिवाशांना धुराचा आणि उग्र वासाचा त्रास सहन करावा लागत आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता पर्यावरणपूरक आणि आधुनिक दाहिनीची गरज निर्माण झाली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पुनावळे स्मशानभूमीत तातडीने आधुनिक चिमणी बसविण्यासाठी खासदार निधीतून अथवा संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करून सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली आहे. यावेळी शिवसेना उपनेत्या तथा नगरसेविका सौ. सुलभाताई उबाळे उपस्थित होत्या. निवेदन सादर करताना परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा व पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न प्राधान्याने मांडण्यात आला.

## शिल्पा गवारे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात

■ पिंपरी (दै. संध्या)

वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर पिंपरी-चिंचवडमध्ये शिल्पा गवारे यांच्या मृत्यूच्या घटनेने पुन्हा एकदा हुंडाबळीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शिल्पा यांच्या मृत्यूला सासरच्या मंडळींचा छळ आणि हुंड्याची मागणी कारणीभूत असल्याचा आरोप त्यांच्या माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुटुंबीयांशी फोनवरून संवाद साधत हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाही दिली आहे.

शिल्पा गवारे या भाजप नगरसेविका स्नेहा कलाटे यांच्या नणंद होत्या. रक्षाबंधनाच्या दिवशी स्नेहा कलाटे यांनी मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून शिल्पाला न्याय मिळवून देण्याची मागणी केली. वाकड परिसरात अल्पावधीत अशा दोन घटना घडल्याचा उल्लेख करत त्यांनी हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला आळा घालण्याची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असे आश्वासन दिल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

कुटुंबीयांच्या आरोपानुसार, शिल्पा यांचा पती सचिन, सासरे उत्तम, सासू संजीवनी आणि दीर संदीप यांच्याकडून दीर्घकाळ मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला. दोन एकर जमीन, व्यवसायासाठी आर्थिक मदत तसेच वेळोवेळी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम देऊनही सासरच्या मंडळींचा पैशांचा हव्यास कमी झाला नाही, असा आरोप माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. मुलगी सुखी राहावी या अपेक्षेने कलाटे कुटुंबीयांनी शक्य ती मदत केली. मात्र, छळ सुरूच राहिल्याने शिल्पाच्या आई-वडिलांनी आणि भावांनी तिला माहेरी परतण्याची विनंती केल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. कुटुंबाचा विचार करून शिल्पा सासरीच राहिली.

# शालेय विद्यार्थिनींनी अधिकारी, पोलीस व सुरक्षा रक्षकांना बांधली राखी

■ पिंपरी (दै. संध्या)

रक्षाबंधन म्हणजे केवळ भाऊ बहिणीच्या नात्यातील प्रेमाचा उत्सव नव्हे, तर एकमेकांच्या सुख दुःखात सोबत राहण्याची आणि रक्षणाची भावना जपणारा सण. याच भावनेला सामाजिक कृतज्ञतेची जोड देत चिखली येथील इनाव्हेटिव्ह वर्ल्ड स्कूलच्या विद्यार्थिनींनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले. शहराच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असलेले महापालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी राखी बांधून आपुलकी, सन्मान आणि कृतज्ञतेचा संदेश दिला.



महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी नगरसदस्य विकास साने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विशेष अधिकारी किरण गायकवाड यांची भेट घेतली. विद्यार्थ्यांनी त्यांना राखी बांधून औक्षण केले. यावेळी महापालिका परिसराची सुरक्षा सांभाळणाऱ्या सुरक्षा रक्षकांनाही विद्यार्थ्यांनी राखी बांधली. तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या पिंपरी चिंचवड पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना देखील त्यांनी राखी बांधून त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक सलाम केला. राखी बांधल्यानंतर विद्यार्थिनींनी अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. रक्षाबंधनाचा सण कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता शहरासाठी आणि समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी म्हणून या उपक्रमाकडे पाहत असल्याची भावना विद्यार्थिनींनी व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या सणाचे महत्त्व आणि भाऊ बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा व परस्पर रक्षणाची भावना अधोरेखित करणारे गीत सादर केले. विद्यार्थ्यांच्या निरागस स्वरांनी आणि उत्स्फूर्त सहभागाने महापालिका परिसरातील वातावरण अधिक प्रसन्न झाले. आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणेच समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या व्यक्तींप्रती आदर व्यक्त करण्याची भावना विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणातून दिसून आली. रक्षाबंधनाच्या निमित्ताने घेतलेला हा उपक्रम प्रेम आणि स्नेहापुरता मर्यादित न राहता सामाजिक भान आणि कृतज्ञतेची जाणीव जागवणारा ठरला. नागरिकांची सेवा करणारे महापालिका अधिकारी कर्मचारी, शहराच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे सुरक्षा रक्षक आणि कायदा सुव्यवस्था राखणारे पोलीस हे समाजाच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी विद्यार्थिनींनी राखीच्या माध्यमातून सुंदर आणि भावनिक संदेश दिला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, कृतज्ञता आणि समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याप्रती सन्मानाची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. कुटुंबातील नात्यांना जोडणारा रक्षाबंधनाचा धागा समाजातील सेवाभावी घटकांशी जोडत विद्यार्थ्यांनी सणाला व्यापक सामाजिक अर्थ दिला. शाळेच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे लोकप्रतिनिधी, महापालिका अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वडगाव शिंदे-काकडे स्मशानभूमी शेड, दशक्रिया घाट करण्यासाठी पाठपुरावा करणार

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

वडगाव शिंदे-काकडे (ता.हवेली) येथे मागे इंद्रायणी नदीला आलेल्या पुरात येथील स्मशानभूमीचे शेड, दशक्रिया घाटाचा काही भाग व इतरत्र भाग पुराच्या जोरदार वाहत्या पाण्यात वाहून गेले होते. याची पाहणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश वरिष्ठ सरचिटणीस तथा विद्युत नियत्रंण समितीचे जिल्हा सदस्य प्रदिप वसंत कंद यांनी गावातील विविध संस्थेच्या पदाधिकारी व ग्रामस्थांना सोबत घेऊन पाहणी केली. यामध्ये स्मशानभूमीची झालेली दुरवस्था पाहून ग्रामस्थांशी चर्चा केली. या स्मशानभूमीची दुरवस्था झाल्याने वडगाव शिंदे-काकडे गावातील नागरिकांना अंत्यविधी व दशक्रिया करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे स्मशानभूमी शेडचे काम व दशक्रिया घाट लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी ग्रामस्थांनी प्रदिप वसंत कंद यांच्याकडे मागणी केली आहे. याबाबत ग्रामस्थांशी संवाद साधताना कंद म्हणाले की,इंद्रायणीच्या पुरामुळे स्मशानभूमीचे व दशक्रिया घाटाचे नुकसान झाल्याचे पाहणी करताना दिसत असल्याने हा अत्यंत संवेदनशील प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत असल्याचे ग्रामस्थांना आश्वासन दिले. कंद म्हणाले, यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार माऊली कटके, आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार सूनील टिंगरे यांच्याशी सातत्याने संपर्क साधून आवश्यक सहकार्य घेण्यात येईल. तसेच पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्याशी पाठपुरावा करून स्मशानभूमी व दशक्रिया विधी घाटाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे कंद यांनी सांगितले.



### सासवड शहरात कीटकजन्य आजार प्रतिबंधासाठी विशेष मोहीम तीव्र

**सासवड: दैनिक संध्या**

कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असलेल्या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सासवड शहरामध्ये कीटकजन्य आजार नियंत्रणासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. याद्वारे ताप रुग्ण सर्वेक्षण, कीटकशास्त्रीय सर्वेक्षण, खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग, शालेय विद्यार्थ्यांची कार्यशाळा, महिलांचा सहभाग आणि विविध प्रसिद्धी माध्यमांद्वारे जनजागृतीचे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे आणि ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन अकमार यांनी दिली आहे. सासवड शहरात सध्या ताप रुग्ण व कीटकशास्त्रीय सर्वेक्षण सुरू असून, हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया यांसारख्या कीटकजन्य आजारांची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित नजीकच्या शासकीय आरोग्य संस्थेत जाऊन तपासणी व औषधोपचार करून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे आणि जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अपर्णा पाटील, पुणे यांनी नागरिकांसाठी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचवल्या आहेत: घराजवळील परिसर स्वच्छ ठेवावा. निरुपयोगी टायर, नारळाच्या करवंट्या, मोकळे डबे, बाल्ट्या आदी वस्तूंची योग्य विल्हेवाट लावावी. झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा. घराजवळील डासोत्पत्तीची ठिकाणे शोधून नष्ट करावीत व सांडपाण्याची गटारे वाहती ठेवावीत. पाणी साठणाऱ्या ठिकाणी रॉकेल किंवा जळके ऑईल वापरावे आणि घरांच्या मोठ्या टाक्यांमध्ये गप्पी मासे सोडावेत. सासवड नगरपरिषदेमार्फत हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया रोखण्यासाठी शहरात धूर फवारणी (फॉगिंग) मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच, शहराच्या दर्शनी भागात मोठे बॅनर्स (हॅण्डहोर्डींग्ज) लावून आणि पत्रके (हँडबिल्स) वाटून डेंग्यू जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या घराजवळील परिसर स्वच्छ ठेवावा, साचलेल्या पाण्याचा निचरा करावा आणि डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, आरोग्य सभापती राजनभैया जगताप, सर्व नगरसेवक व नगरसेविका तसेच ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य निरीक्षक विजय सोनवणे, फिरोज तांबोळी आणि संतोष भोसले यांनी केले आहे.

### धोलवडमध्ये ‘एक राखी जवानांसाठी’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**सासवड: दैनिक संध्या**

देशाच्या सीमांचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी धोलवड येथील शिवनेरी विद्यालयात 'एक राखी जवानांसाठी' हा अभिनव उपक्रम अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. विद्यालयाचे मुख्याध्यापक समीर वामन यांनी या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. भारतीय डाक विभाग आणि ओतूर परिसराच्या सौजन्याने हा विशेष कार्यक्रम राबविण्यात आला होता.या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून या विविध प्रकारच्या राख्या बनवल्या होत्या. विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने या राखी मेकिंग उपक्रमात सहभाग घेतला. या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या सैनिकांसाठी स्वतःच्या हाताने सुंदर आणि आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्या पोस्टाच्या माध्यमातून देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांपर्यंत पोहोचवण्यात आल्या आहेत. स्वतःच्या हाताने बनवलेली राखी जवानांपर्यंत पोहोचल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात देशाच्या रक्षकांविषयी असलेला आदर, कृतज्ञता आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन आणि मार्गदर्शन उपशिक्षिका स्मिता कानडे, अक्षदा येंधे, सुरेखा पानसरे, पायल वाघ यांच्यासह शिक्षक भाऊ वेडे, रोशन घोडे,राजू गोसावी, क्षितिज शिंगोटे, मृण्मय ढमाले, सागर शिवशरण यांनी केले. शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर राख्या तयार करून हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडला. शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# नारायणगाव येथे डिजे मुक्त “ईद ए मिलाद : पैगंबर जयंती” साजरी

## ग्रामपंचायतच्यावतीने गुलाबपुष्प देत स्वागत तर मुस्लिम बांधवांची छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार

■ नारायणगाव (दै. संध्या)

इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर साहेबांची १५०१ वी जयंती अर्थात ईद-ए-मिलाद विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नारायणगावमध्ये असलेला हिंदू मुस्लिम एकोपा जपत मुस्लिम बांधवांनी डीजे न लावता, मोहमंद पैगंबर यांच्यावर स्तुतीगीत तसेच घोषणाबाजी करत सुन्नी मुस्लिम जमात नारायणगाव यांच्या वतीने मोठ्या उत्साहात जुलूस काढण्यात आला.

नारायणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाबपुष देत स्वागत केले तर मुस्लिम बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. यावेळी जुलूस मार्गावर सर्वधर्मीयांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत, प्रसाद वाटप करत स्वागत, नारायणगाव पोलीस स्टेशनने पाणी वाटप या कार्यक्रमांनी बंधूभावाचा संदेश देत निघालेला पैगंबर साहेबांचा हा जुलूस लक्षवेधी ठरला.

सुन्नी जामे मस्जिद पासून मुफ्ती मुनाजीर हुसेन व मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार यांच्या मार्गदर्शनाखाली जुलूसची सुरुवात झाली. बाजारपेठ मार्गे छत्रपती शिवाजी चौक, हनुमान चौक, जुन्नर




रोड ते बसस्थानक येथून भाजी बाजार मार्गे येऊन सुन्नी जामा मस्जिद मुस्लिम मोहल्ला येथे जुलुसची सांगता करण्यात आली.

जुलूसमध्ये मुफ्ती मुनाजीर हुसेन, हाफिज शहबाज रजा, हाफिज ताहीर मणियार व मौलाना सद्दाम यांच्या मार्गदर्शनाखाली मदरसा अरबीया गुलशने मदिना आणि मदरसतुल मदिना गौसूल आझमच्या मुलांनी पैगंबर साहेबांच्या मानवतावादी शांती व सद्भावनेच्या घोषणा, आकर्षण वेशभूषा, पेहराव यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हजरत टिपू सुलतान लायन्स क्लबच्या युवकांनी तयार केलेली (मस्जिद ए नबवी मदिना मुनवरा) या प्रतिकृतीने जुलूसमध्ये उपस्थितांचे लक्ष वेधले. यानिमित्ताने शिवसेना तालुकाप्रमुख व उपसरपंच बाबू पाटे, सरपंच डॉ. शुभदा वाव्हळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, युवा नेते सुरज वाजगे माजी उपसरपंच संतोष वाजगे, ग्रामपंचायत सदस्य आरिफ आतार, जुबेर आतार, संतोष दांगट, गणेश पाटे, संतोष पाटे, बाळा वाव्हळ, यांसह ग्रामपंचायतच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन तसेच मुस्लिम समाजाचे पदाधिकारी यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच नारायणगाव पोलिस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण संपांगे पोलिस उपनिरीक्षक जगदीश पाटील, दत्ता ढेंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी मुस्लिम जमात अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त मेहबूब काझी, अली इनामदार, रशिद इनामदार, विश्वस्त हाजी नूरमोहम्मद मणियार, गफुर तांबोळी, सलीम मणियार, युवा शक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष अशफाक पटेल, जावेद पटेल, सकलेन आतार, सलमान आतार, समीर इनामदार, रज्जाक काझी, रियाज मणियार, जुबेर शेख, निसार तांबोळी, मुनीर मोमीन, फारुक मोमीन, एजाज चौधरी, आजिम शेख, शहेबाज आतार, यांसह सुन्नी जामे मस्जिदचे पदाधिकारी, मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुन्नी मुस्लिम जमात यांच्यावतीने आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५ वाजता सलाम पठणाने झाली. त्यानंतर सामुहिक कुरआन पठण व मिठाई वाटप करण्यात आले. मदरसा अरबीया गुलशने मदिना मधील मुलामुलींचे कुरआन अध्ययन पूर्ण केल्याबद्दल १३ मुलांचे ‘तकमिल - ए- कुरआन’ प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. तसेच क्विझ स्पर्धेत ७० मुलांनी सहभाग घेतला. यावेळी मुलांचे पालक, नातेवाईक आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पैगंबर जयंतीनिमित्त आठवडाभर चाललेल्या कार्यक्रमात मजलीस व दरुदखानी, महिलांसाठी इजतेमा, मिलाद पठण, मुलांचे धार्मिक कार्यक्रमाचे सादरीकरण, मिठाई, खीर व शरबत वाटप, सर्वधर्मीयांसाठी आरोग्य शिबिर व जुलूसच्या समारोपानंतर लंगर-ए-मुस्तफाचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम जमात नारायणगाव यांनी आयोजित केलेल्या सर्व उपक्रमांचे सरपंच शुभदा वाव्हळ, उपसरपंच योगेश बाबू पाटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, युवा नेते सुरज वाजगे व ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले.



## राजगुरुनगरमध्ये ईद-ए-मिलाद साजरी

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती अर्थात ईद-ए-मिलाद राजगुरुनगर येथे आज मोठ्या उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. तसेच लहान मुलांचे धार्मिक कार्यक्रम, शालेय साहित्य वाटप, मिठाई व सरबत वाटप आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पैगंबर जयंतीनिमित्त राजगुरुनगर येथील उत्तर मशिदीपासून मिरवणुकीला सुरुवात झाली. बाजारपेठ मार्गे ही मिरवणूक मोमिन आळी येथे पोहोचून सांगता झाली. मिरवणुकीत शहर व परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेषतः लहान चिमुकल्यांचा उत्साह लक्षवेधी ठरला.

मिरवणुकीमध्ये प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मानवजातीला दिलेल्या प्रेम, बंधुभाव, शांतता, दया आणि मानवतेच्या संदेशांचे फलक प्रमुख आकर्षण ठरले.

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने क्रांतिवीर राजगुरू चौकातील तरुणांच्या वतीने नागरिकांसाठी सरबत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध ठिकाणी मिठाई वाटप करून नागरिकांना ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

सांगता समारंभावेळी येथील मशिदीचे मौलाना अली अजगर, मौलाना रजा, मौलाना मुस्तकीम, हाफिज मुफस्सिर, हाफिज आदिल रजा आणि मौलाना गौसुलवरा यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची शिकवण, त्यांचे मानवतावादी संदेश आणि आदर्श आचरण याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी धार्मिक पठण करण्यात आले तसेच समाजात शांतता, बंधुभाव, एकोपा आणि सर्वधर्मीय सलोखा कायम राहण्यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर मुस्लिम समाजाचे अध्यक्ष समीर मोमीन,नौशाद तांबोळी, खलील मोमीन,नगरसेवक फैज मोमीन,मुस्लिम फ्रेंड सर्कल चे अध्यक्ष रफिक मोमीन,ॲड.इम्रान मोमीन, उपस्थित होते. जयंतीनिमित्त रात्री उशिरापर्यंत लहान वयोगटातील मुलांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सुमारे १५० मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मुलांनी हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या स्तुतीपर नात, कलमा आणि तकरीर सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या धार्मिक कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी सहभागी मुलांना शालेय साहित्य भेट देण्यात आले.

ईद-ए-मिलाद जयंतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैद तांबोळी, अल्फेज मोमीन, मुदस्सिर शेख, तहलील मोमीन, मुदस्सिम मोमीन, नविद मोमीन, आयान मोमीन, साद मोमीन, एराफ मोमीन, अर्श मोमीन, फुरकान मोमीन, फरहान तांबोळी आदी कार्यकर्त्यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

## कवठे येमाईत श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

■ कवठे येमाई (दै. संध्या)

भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कवठे (यमाई) येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गोपाळ कृष्ण देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ कवठे (यमाई) यांच्या वतीने हा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीकृष्ण जन्म कीर्तन रात्री १० ते १२ वाजेपर्यंत होणार आहे. या कार्यक्रमात ह.भ.प. भरत महाराज थोरात (चिंतन केसरी, वडगाव पाटोळे, राजगुरुनगर) यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असून, त्यांना कीर्तनसाथ ह.भ.प. प्रकाश महाराज गुंजाळ यांची लाभणार आहे.

त्यानंतर शनिवार, दि.५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या धार्मिक सोहळ्यास परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन



आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे : मा. ना. श्री. दिलीप वळसे पाटील, माजी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य व शिरूर चे माजी आमदार मा. श्री.पोपटराव गावडे हे उपस्थित राहणार असून अधिकाधिक भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन श्री गोपाळ कृष्ण देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ,कवठे (यमाई) यांनी केले आहे.

## पीडित कुटुंबाची मंत्री झिरवळ यांनी घेतली भेट

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार आणि त्यानंतर तिच्या हत्येच्या अत्यंत दुर्दैवी व संतापजनक घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी नुकतीच पिंपळवंडी गावाला भेट देऊन पीडित मुलीच्या कुटुंबाची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

या धक्कादायक घटनेनंतर पीडित कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरात सहभागी होत मंत्री झिरवळ यांनी संपूर्ण कुटुंबाशी सविस्तर संवाद साधला. घडलेल्या प्रकाराची माहिती घेतल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची अत्यंत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी भूमिका मांडली.

## श्री संत शिरोमणी सावता महाराज पालखीची तिर्थक्षेत्र ‘अरण’ ला ग्रामप्रदक्षिणा

■ पुरंदर (दै. संध्या)

सावता; 'ज्ञानदेव, नामदेव, सावता'; चा गजर करत श्री क्षेत्र सासवड (ता. पुरंदर) येथील संत सोपान काका समाधी मंदिरातून गुरूवार (दि.१३) ऑगस्ट रोजी निघालेला, श्री संत शिरोमणी सावता महाराजांचा पायी पालखी सोहळा श्री क्षेत्र अरण भेंडी (ता.माढा,जि. सोलापूर) येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी मंदिरात शुक्रवार (दि.२१) रोजी पोहचला. यावेळी श्री क्षेत्र अरण येथे संत शिरोमणी सावता महाराज पालखीचे फुलांच्या पायघड्या व फटाक्यांची जोरदार आतषबाजीत स्वागत करण्यात आले.

शनिवारी पहाटे काकड आरती झाली. यानंतर श्री च्या पादुकांची विधी पूर्वक पूजा,तसेच समाधी मंदिरातील अभिषेक, पुजाविधी सोहळा संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.दिलीप महाराज झगडे, उपाध्यक्ष भानुदास हिंगणे, सचिव महावीर भुजबळ, राजाभाऊ अडसूळ, ह.भ.प.,संतोष



महाराज जाधव, लोणंद येथील उद्योजक राजकुमार क्षिरसागर, सुनिता क्षिरसागर व समिती सदस्य यांच्या हस्ते संपन्न झाला.

यानंतर, विविध फुलांनी सजवलेल्या रथा मधून पालखी व पादुका घेऊन श्री क्षेत्र अरण गावची ग्राम प्रदक्षिणा,वारकरी वैष्णवांबरोबर पूर्ण केली. यावेळी टाळ-मृदंगाच्या ताला वरती भागवत धर्माच्या भगव्या पताका हातात घेऊन 'निवृत्ती ज्ञानदेव, सोपान सावता' चा गजर करत मोठ्या उत्साहात ग्राम प्रदक्षिणा पूर्ण केली. यानंतर सकाळी दहा ते साडेबारा दरम्यान काल्याचे कीर्तनाची सेवा सोहळा प्रमुख ह.भ.प. दिलीप महाराज झगडे यांनी केली. यानंतर समाज आरती घेण्यात आली.

डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, सातारा जिल्हा परिषद सदस्य गिरीश बनकर, व्यसनमुक्ती केंद्राचे तरुणांचे मित्र ह.भ.प.बंडातात्या कराडकर, व्यवस्थापक शिवाजी राऊत, सासवड नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका मंगल म्हेत्रे, समता परिषदेचे पुणे जिल्हाध्यक्ष अनिल लडकत, सरचिटणीस शंकर भुजबळ, आबा भोंगळे, क्रांतीसूर्य समता विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष भुजबळ, ह.भ.प.सोपानकाका टेंभुकर, ह.भ.प. केशव आप्पा नामदास, ताम्हाणे आप्पा, बापू बनकर, सतीश बोरावके, राजेंद्र तरटे, सुदाभाऊ गिरमे, बंडूशेठ घाडगे, सूर्यकांत भुजबळ, जयवंत भुजबळ, शिवाजी भुजबळ आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, पालखी रथाच्या बैलजोडीचा मान बेलसर येथील शेतकरी हिरामण जगताप यांना मिळाला होता. तर रथ सजावटीचा मान सतिश बोरावके यांना मिळाला होता. यांच्यासह पायी पालखी सोहळ्यात सहभागी झालेले वारकरी, गायक-वादक महाराज, वैष्णव जन, तसेच सोहळा सुरू झाल्या पासून ते समारोपापर्यंत गावोगावचे पालखी सोहळा मार्गावरील सहकार्य, मदत, योगदान देणारे, आर्थिक, वस्तु साहित्य रुपाने, तन -मन-धनाने, सामुहिक, वैयक्तिक, संस्था याव्दारे सोहळा समितीस सहकार्य करणारे भाविक, ग्रामस्थ, संस्था, यांचा सोहळा समितीच्या वतीने शाल श्रीफळ व मानधन देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या पालखी सोहळ्यात, पुरंदर, फलटण, सातारा, बारामती, दौंड, इंदापूर, माढा, हडपसर, मुंढवा, आळंदी, धाराशिव आदी भागातील हजारो भाविक-भक्त सहभागी झाले होते.

श्री क्षेत्र अरण येथे उपस्थित वैष्णवांना,व भाविकांना महाप्रसाद अन्नदान सेवा, लोणंद येथील उद्योजक राजकुमार क्षिरसागर व पुरंदरचे आमदार विजय बापू शिवतरे मित्र मंडळ सासवड यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चिमुकल्या मुलीने बांधली खंडोबा देवाला राखी

जेजुरी : दैनिक संध्या

देशात सर्वत्र रक्षा बंधनाची धामधूम सुरू असताना. राखी पौर्णिमेचे औचित्य साधून महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या मंदिरात खंडोबा देवाच्या मूर्तीला चिमुकल्या मुलींनी राखी बांधून रक्षा बंधन साजरे केले.

### सोनी सब कलाकारांनी त्यांच्या वैयक्तिक आवश्यक वस्तू उघड केल्या ज्या ते नेहमी जवळ ठेवतात

पुणे : दैनिक संध्या

टेलिव्हिजन कलाकारांसाठी व्हॅनिटी किंवा ग्रीन रूम ही फक्त सीनच्या मध्ये तयार होण्यासाठीची जागा नसते. ही त्यांची दिवसाची तयारी करण्याची, सीनच्या मध्ये विश्रांती घेण्याची, स्क्रिप्ट वाचण्याची, सहकलाकारांशी गप्पा मारण्याची आणि कधी कधी स्वतःसाठी शांत क्षण शोधण्याची जागा असते. प्रत्येक कलाकार आपली जागा आरामदायी बनवतो, पण काही वैयक्तिक आवश्यक वस्तू अशा असतात ज्या अपरिहार्य ठरतात. सोनी सब कलाकार मुस्कान बामने, दीक्षा जोशी, इकबाल खान, गुलकी जोशी, तोरल रसपुत्रा आणि जितेन ललवानी यांनी त्यांच्या व्हॅनिटी रूममधील रोजच्या आवश्यक वस्तू उघड केल्या. इकबाल खान, जो यादें मध्ये डॉ. देवची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, "माझं मेकअपचं ठिकाण माझ्यासाठी खूप वैयक्तिक आहे. तिथे नेहमी माझी प्रार्थना चटई असते कारण मला शांत क्षण महत्त्वाचे वाटतात. माझी स्वतःची खुर्ची आहे जी थोडी रीक्लाइन होते, कारण इतक्या वर्षांनंतर मला जाणवलं की आरामदायी खुर्ची ही खरंच लक्झरी आहे! मी चॉकलेट्स ठेवतो, विशेषतः मुलं सेटवर आली तर त्यांना काही देण्यासाठी. आणि नेहमी एक सोफा असतो, जेणेकरून कोणी बोलायला आलं तर उभं राहावं लागू नये. त्यामुळे माझी व्हॅनिटी म्हणजे माझं वैयक्तिक स्पेस आणि थोडं सगळ्यांसाठीही." मुस्कान बामने, जी पुष्पा इम्पॉसिबल मध्ये शनायाची भूमिका साकारते, यांनी सांगितले, "माझी व्हॅनिटी रूम माझ्यासाठी स्वतःला रीसेट करण्याचं छोटं स्पेस आहे, त्यामुळे मला नेहमी काही अशा गोष्टी जवळ ठेवायला आवडतात ज्या आरामदायी आणि ओळखीच्या वाटतात. संगीत माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे, म्हणून माझ्याकडे नेहमी इअरफोन्स असतात. मी काही वैयक्तिक छायाचित्रंही ठेवते कारण सीनच्या मध्ये ओळखीचे चेहरे पाहून मला लगेच आनंद मिळतो. या छोट्या गोष्टी वाटायला साध्या असल्या तरी त्या व्हॅनिटीला माझं स्वतःचं स्पेस बनवतात." दीक्षा जोशी, जी पुष्पा इम्पॉसिबल मध्ये दीप्तीची भूमिका साकारते, यांनी सांगितले, "माझ्या व्हॅनिटीमध्ये दोन गोष्टी नेहमीच हव्या असतात पाणी आणि एक चांगला परफ्यूम मिस्ट. दिवसभर मी पाणी पिते आणि परफ्यूम मिस्ट मला ताजेतवाने वाटण्यासाठी छोटासा आधार असतो. विशेषतः वेगवेगळ्या सीनमध्ये जाताना या दोन गोष्टी जवळ असणं खूप फरक पडतं. त्या साध्या आहेत, पण त्यापैकी एकही नसेल तर मला खरंच अपूर्ण वाटतं."

### आभास मेहता हस्तिनापुर के वीर मालिकेत दिसणार जरासंधच्या भूमिकेत

पुणे : दैनिक संध्या



सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर प्रेक्षकांना महाभारताच्या जगात आणखी खोलवर घेऊन जाते, जिथे सत्तासंघर्ष, युती आणि महत्वाकांक्षा दाखवल्या जातात ज्यांनी महायुद्धाच्या खूप आधीच राज्याची घडण केली आणि पांडव-कौरवांवर प्रभाव टाकला. कथानकात एक नवीन रोचक स्तर आणत, अभिनेता आभास मेहता मगधचा सामर्थ्यवान राजा जरासंधची भूमिका साकारतो, ज्याचे स्वप्न आर्यावर्तभर आपले साम्राज्य विस्तारण्याचे आहे. भीष्म पितामह (मनीष वधवा) हस्तिनापुरवर कोणत्याही थेट हल्ल्याच्या आड येतात हे जाणून, जरासंध अधिक सावध मार्ग निवडतो आणि दूरूनच आपल्या चालांची योजना आखू लागतो. त्याचा प्रवेश राज्यासाठी एक नवीन धोका घेऊन येतो, कारण तो असे मार्ग शोधतो ज्यामुळे हस्तिनापुराला कमजोर करता येईल, त्याच्या सर्वात शक्तिशाली योद्ध्याला थेट सामोरे न जाता. धृतराष्ट्रावर (संदीप मोहन) नजरेसह, आपल्या ध्येयाजवळ पोहोचण्यासाठी जरासंध कोणती चलाख रणनीती वापरेल? आभास मेहता, जो जरासंधची भूमिका साकारतो, म्हणाले, "जरासंध हा खूप रोचक पात्र आहे कारण त्याची महत्वाकांक्षा फक्त एखादं युद्ध जिंकण्यापलीकडे जाते. तो महत्वाकांक्षा, सत्ता आणि रणनीतीने प्रेरित असलेला पात्र आहे. तो असा शासक आहे जो नेहमी मोठ्या चित्राबद्दल विचार करतो आणि आपली सत्ता कशी वाढवता येईल यावर लक्ष केंद्रित करतो. त्याला माहीत आहे की तो हस्तिनापुरावर थेट हल्ला करू शकत नाही कारण भीष्म पितामह तिथे आहेत, त्यामुळे तो आपला मेंदू वापरून काळजीपूर्वक योजना आखतो. तो संयमी, रणनीतिक आणि नेहमी संधी शोधत असतो. इतक्या महत्वाकांक्षी आणि भव्यतेने भरलेल्या पात्राची भूमिका साकारताना मला खूप रोमांचक अनुभव आला आहे."

### वडार समाजाचा पिंपरी चिंचवड येथे संकल्प मेळावा

पिंपरी : दैनिक संध्या

वडार समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आणि प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी संघटितपणे निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेच्या वतीने जानेवारी २०२७ मध्ये कोल्हापूर येथे भव्य महामेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. केंद्रीय अथवा राज्य सरकारमधील मंत्री महोदयांच्या उपस्थितीत होणाऱ्या या महामेळाव्यात वडार समाजाच्या विविध मागण्या शासनदरबारी प्रभावीपणे मांडून त्या मंजूर करून घेण्यासाठी व्यापक जनआंदोलनाची दिशा निश्चित केली जाणार आहे,अशी माहिती पिंपरी येथे पत्रकार परिषदेत देण्यात आली, त्यावेळी कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे, नगरसेवक राहुल भोसले, प्रदीप पवार,पिंटु जाधव आदी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड येथे ३० ऑगस्ट रोजी वडार समाज संकल्प मेळावा : या महामेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी पुणे जिल्ह्याची जबाबदारी संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सुरेश धोत्रे यांनी स्वीकारली असून, त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड येथे ३० ऑगस्ट रोजी वडार समाज संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. क्वालिटी सर्कल फोरम, टेल्को रोड, भोसरी येथे सकाळी ११ वाजता हा मेळावा होणार आहे. या संकल्प मेळाव्यास 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नवी मुंबई महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. समाजाच्या हक्कांसाठी केवळ मागण्या न करता त्या संघटित शक्तीच्या माध्यमातून शासनाकडून मंजूर करून घेण्याचा निर्धार या मेळाव्यात करण्यात येणार आहे.

# झोपडपट्टी व अतिक्रमणधारकांच्या जागा नागरिकांच्या नावावर करा

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर शहरातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये तसेच अतिक्रमणाच्या जागेवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागा शासनाच्या नियमानुसार नियमित करून त्यांच्या नावावर सनद देण्यात यावी, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्निल माळवे यांनी केली आहे.

यासंदर्भात ॲड. माळवे यांनी शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पाटील यांना निवेदन देऊन शासनाने जारी केलेल्या संबंधित जीआर व आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. झोपडपट्टीधारक व अतिक्रमणाच्या जागेवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर व जागेचा कायदेशीर आधार मिळावा, यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ॲड. माळवे यांनी यापूर्वी ९ एप्रिल २०२६ रोजी शिरूर नगर परिषदेसह संबंधित कार्यालयांशी पत्रव्यवहार केला होता. मात्र, त्यानंतरही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर प्रशासन अधिकारी व सहआयुक्त घोलप यांनी २० जुलै २०२६ रोजी शिरूर नगरपरिषदेला संबंधित प्रकरणाचा तात्काळ अहवाल सादर करून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे माळवे यांनी सांगितले.मात्र, या निर्देशांनंतरही नगरपरिषदेकडून ठोस कार्यवाही झालेली नसल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. शासनस्तरावरून स्पष्ट निर्देश असताना ही स्थानिक प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याने नागरिकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, अशी खंत ॲड. माळवे यांनी व्यक्त केली. आज २७ ऑगस्ट २०२६ रोजी ॲड. स्वप्निल माळवे यांनी मुख्याधिकारी पाटील यांना पुन्हा स्मरणपत्र देत प्रलंबित प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. संबंधित प्रकरणात सात दिवसांच्या आत पुढील कार्यवाही न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.शिरूर शहरातील झोपडपट्टी व अतिक्रमणधारक नागरिकांच्या प्रश्नावर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मांडून तो मंजूर करण्यात यावा आणि शासनाच्या आदेशानुसार पुढील प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणीही ॲड. माळवे यांनी मुख्याधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेदरम्यान केली.दरम्यान, सन २००० पूर्वीपासून अतिक्रमणाच्या जागेवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी आपल्याकडे उपलब्ध असलेली ओळखपत्रे, रेशनकार्ड, वीजबिल, नगरपरिषदेच्या करपावत्या, प्रतिज्ञापत्र तसेच इतर संबंधित कागदपत्रे तात्काळ जमा करावीत, असे आवाहन ॲड. माळवे यांनी केले आहे.




# चाकणला ज्ञानवर्धिनी विद्यालयात मुलींनी बांधल्या जवानांना राख्या



■ चाकण (दै. संध्या)

बहिण भावाचे नाते घट्ट करणारा रक्षाबंधन सण ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी एनडीआरएफ च्या जवानांना राख्या बांधून मोठ्या दिमाखात साजरा केला.

येथील स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानवर्धिनी विद्यालय तसेच स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी आणि शिक्षिकेंनी सुदुंबरे येथील एनडीआरएफच्या जवानांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असणारे हे जवान वर्षांचे ३६५ दिवस आणि २४ तास सर्वांच्या सेवेसाठी कार्यरत असतात. अनेकदा कर्तव्यामुळे त्यांना सण, उत्सवांच्या दिवशी कुटुंबीयांपासून दूर राहावे लागते. अशा सेवाभावी जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थिनींनी त्यांना राख्या बांधल्या. यावेळी एनडीआरएफचे कमांडर संतोष बहादूर सिंग, सरोज कुमार, अशोक कुमार, प्रविण दत्त व जस्टीन जोफेस यांच्यासह ६० जवानांनी विद्यार्थ्यांना एनडीआरएफच्या कार्याची व आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य कसे केले जाते, याबाबत चौफेर मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वसंरक्षण आणि सायबर क्राईम या विषयांवर नाट्य छटांच्या माध्यमातून जनजागृतीपर संदेश सादर केला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे जवानांनी कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, आदर्श शिक्षक दत्तात्रय लिंभोरे, सिद्धार्थ मळेवाडी, गणेश काळे, स्वाती काळे व रूपाली भालेराव आदी उपस्थित होते. स्वाती काळे यांनी प्रास्ताविक केले. रूपाली भालेराव यांनी सूत्रसंचालन, तर मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

# "कापूसकोंडा" येतोय २३ ऑक्टोबरला

■ पुणे (दै. संध्या)

माणूस आणि प्राणी यांच्यातील भावभावना, नातेसंबंधांचे धागे मनोरंजक पद्धतीने उलगडणाऱ्या "कापूसकोंडा" या चित्रपटाची पहिली झलक खास रक्षाबंधनाच्या निमित्ताने सोशल मीडियावर लाँच करण्यात आली आहे. येत्या २३ ऑक्टोबरला "कापूसकोंडा" चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून, चित्रपटाची पहिली झलक पाहून चित्रपटाची उत्सुकता वाढवणारी आहे.

पॅनोरामा स्टुडिओस प्रस्तुत व्हीपी माऊली ग्रुप ऑफ कंपनीज सह स्टोरीवाला फिल्म हा चित्रपट सादर करीत असून जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. नी "कापूसकोंडा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. "कापूसकोंडा" चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांच आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. गाणी संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी सुरबद्ध केली आहेत तर पार्श्वसंगीत अभिजीत हेगडेपाटील या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर व अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे. सचिन पिळगावकर याच्या नवरा माझा नवसाचा या चित्रपटात मधुराणी गोखले यांनी कँडी ही मजेशीर भूमिका साकारली होती. आता कापूसकोंडा या चित्रपटातून सचिन पिळगावकर आणि मधुराणी गोखले पुन्हा एकत्र आले आहेत. "कापूसकोंडा" चित्रपटाची कथा अत्यंत अनोखी आहे.



# नियमांच्या चौकटीत राहून गणेश उत्सव साजरा करा

■ जेजुरी (दै. संध्या)

नियमांच्या चौकटीत राहून उत्साहाने गणेश उत्सव साजरा करा. डिजे,डॉल्बी ही आपली संस्कृती नाही त्याच्या नादी लागू नका. पारंपारिक वाद्य व्यवसायिकांना प्रोत्साहन द्या. असे आवाहन पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी केले.

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीचे जेजुरी येथे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीस जेजुरी, नीरा, वाल्हे व पंचक्रोशीतील गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना रवींद्र पाटील यांनी ब्रिटिश काळात फोडा आणि झोडा या नीतीच्या विरोधात जनजागृती व राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी गणेश व शिव जयंती सुरू केली. गणेशोत्सवाला पुणे जिल्ह्यात मोठी परंपरा आहे. येणारा गणेशोत्सव कायद्याच्या, नियमांच्या चौकटीत राहून मोठ्या उत्साहाने साजरा करा. महाराष्ट्र शासनाने हा उत्सव राज्य उत्सव म्हणून जाहीर केला आहे. राज्य व जिल्हा स्तरावर गणराया पुरस्कार मिळविण्यासाठी मंडळांनी प्रयत्न करावेत. डीजे डॉल्बीच्या नादी लागून नका, महिला वयोवृध्द, लहान मुले यांना आवाजाचा प्रचंड त्रास होतो, मिरवणुकीत लेझरचा वापर केल्यास मंडळावर गुन्हा दाखल केला जाईल असा इशारा ही पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी दिला. जेजुरी पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार यांनी गणेशोत्सव काळात नियम पाळावेत.

# जयाद्री खोऱ्यात अनोखे वृक्ष रक्षाबंधन

■ पुरंदर (दै. संध्या)

राज्यभर रक्षाबंधनाचा सण भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा, आपुलकीचा आणि स्नेहाचा उत्सव म्हणून मोठ्या उत्साहात साजरा होत असताना, जेजुरीच्या जयाद्री सखी परिवाराच्या महिलांनी अनोखा पर्यावरणपूरक उपक्रम राबवत वृक्ष रक्षाबंधन साजरे केले.

जयाद्री खोऱ्यातील अहिल्याच्या प्रांगणात आयोजित या उपक्रमात स्वप्नाली अजित बगाडे, मंजुषा अजित हसबे, नंदिनी प्रशांत पवार, स्मिता विकी कदम आणि पूजा गाडगे यांनी आपल्या कलाकौशल्यातून आकर्षक फुलांच्या राख्या तयार केल्या. त्यानंतर वृक्षांचे पूजन करून निसर्गाच्या सान्निध्यात वृक्षराखीची प्रदक्षिणा करण्यात आली. महिलांनी झाडांना राखी बांधून त्यांच्या संरक्षणासाठी प्रार्थना केली.

अहिल्याच्या प्रांगणातील चिंच व इतर वृक्षांना राखी बांधत महिलांनी वृक्षसंरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.



सहभागी महिलांनी सांगितले की, "ज्या वृक्षांनी जगाला प्राणवायू दिला, फळे दिली आणि उन्हाच्या कडाक्यात सावली दिली, त्या वृक्षांचे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या वृक्षांना भाऊ मानून राखी बांधत आम्ही निसर्गाशी आपले नाते अधिक दृढ केले आहे." सध्या जेजुरी परिसरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असून, वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. उन्हाळ्यात सावलीच्या शोधात भटकंती करताना एखादे मोठे झाड दिसणेही दुर्मिळ होत चालले आहे. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या वृक्षांचे संरक्षण करण्याबरोबरच मोठ्या प्रमाणावर नव्याने वृक्षलागवड करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. याच सणांच्या माध्यमातून निसर्गाशीही आपले नाते जोडून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, या उद्देशाने जयाद्री सखी परिवार आणि लोकमंच परिवाराने

# ड्राय बल्क कार्गो हाताळण्यासाठी बर्थसाठी 'अवॉर्ड ऑफ कन्सेशन' मंजूर

■ मुंबई, (दै. संध्या)

किनारपट्टीवरील जलवाहतुकीला इंधन-कार्यक्षम, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक वाहतूक मार्ग म्हणून प्रोत्साहन देण्याच्या भारत सरकारच्या धोरणाशी सुसंगत राहून, पारादीप पोर्ट प्राधिकरणाने (पीपीए) एएम/एनएस इंडियाची एसपीव्ही असलेल्या 'एएमएनएस पारादीप लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड'ला (एपीएलपीएल) 10 एमटीपीए क्षमतेच्या कॅप्टिव्ह तत्त्वावर ड्राय बल्क कार्गो हाताळणीसाठी सीक्यू-III बर्थच्या यांत्रिकीकरणासाठी अधिकृतपणे 'अवॉर्ड ऑफ कन्सेशन' मंजूर केले आहे. 21 ऑगस्ट 2026 रोजी ओडिशातील पारादीप येथील बिजू कन्व्हेन्शन येथे आयोजित एका विशेष समारंभात, भारत सरकारचे केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री श्री सर्वानंद सोनोवाल यांच्या हस्ते हा पुरस्कार एएम/एनएस इंडियाचे चीफ - कॉर्पोरेट अफेयर्स श्री दीपक अरोरा यांना प्रदान करण्यात आला.

30 वर्षांच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आलेली ही सवलत मालवाहतुकीची अखंड हालचाल सुनिश्चित करेल, एएम/एनएस इंडियाची कार्यक्षमता वाढवेल आणि पर्यावरणपूरक शाश्वततेप्रती कंपनीची कटिबद्धता अधिक मजबूत करेल. ही व्यवस्था एपीएलपीएलला एएम/एनएस इंडियाच्या पेलेट प्लांट कॉम्प्लेक्सपासून थेट पीपीए येथील बर्थपर्यंत जोडलेल्या पूर्णपणे यांत्रिकीकृत कन्व्हेयर प्रणालीद्वारे लोहखनिज पेलेटची शिपमेंट हाताळण्यास सक्षम करेल. एएम/एनएस इंडियाद्वारे पारादीप ते हजिरापर्यंत लोहखनिज पेलेटची किनारपट्टीवरून होणारी जलवाहतूक ही वाहतुकीची एक प्रस्थापित पर्यावरणपूरक पद्धत आहे. सीक्यू-III बर्थचा कॅप्टिव्ह वापर केवळ एएम/एनएस इंडियाच्या दीर्घकालीन वाढीस पाठबळ देणार नाही, तर कंपनीच्या मजबूत आणि पर्यावरणपूरक पुरवठा साखळीच्या पाइपलाइनमधील एक महत्त्वपूर्ण दुवा म्हणूनही काम करेल.

हा पुरस्कार एएम/एनएस इंडियाच्या लॉजिस्टिक्स क्षमता बळकट करण्याच्या आणि बंदर कामकाजाचे आधुनिकीकरण करण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. पारादीपला जागतिक सागरी प्रवेशद्वार बनवण्यासाठी कार्यात्मक उत्कृष्टता, नवोन्मेष आणि भागीदारीप्रती एएम/एनएस इंडियाची कटिबद्धता यातून पुन्हा एकदा सिद्ध होते.


याप्रसंगी ओडिशा सरकारचे उद्योग, कौशल्य विकास आणि तांत्रिक शिक्षण विभागाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री संपद चंद्र स्वेन, जगतसिंगपूरचे खासदार श्री विभू प्रसाद तराई, पारादीप पोर्ट प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री पी. एल. हरनाध (आईआरटीएस), पारादीप पोर्ट प्राधिकरणाचे उपाध्यक्ष श्री टी. वेणू गोपाल, एएम/एनएस इंडियाचे ओडिशा ऑपरेशन्सचे प्रमुख श्री यु.एस.आर. राजू यांच्यासह पीपीएचे वरिष्ठ अधिकारी आणि पारादीपमधील इतर कॉर्पोरेट नेते उपस्थित होते.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६



www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



# मानवी मूल्ये, सर्जनशील विचारांची निर्मिती व्हावी

## कर्नल प्रा. शिशिर कुमार, दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या शताब्दी वर्षाला प्रारंभ : बोधचिन्हाचे अनावरण

■ पुणे (दै. संध्या)

संतुलित शिक्षण महत्त्वाचे असून त्याचा उद्देश चारित्र्य, मानवी मूल्ये आणि सर्जनशील विचारांची निर्मिती करणे हा असणे आवश्यक आहे. ज्या शिक्षणातून चारित्र्याची निर्मिती होत नाही त्या शिक्षणाला काहीही अर्थ नाही. शिक्षण हा अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा एकमेव मार्ग आहे, असे प्रतिपादन निवृत्त कर्नल प्रा. शिशिर कुमार यांनी केले.

शैक्षणिक क्षेत्रात आपल्या प्रदीर्घ आणि गौरवशाली वाटचालीचा ठसा उमटविणाऱ्या दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेला २९ ऑगस्ट २०२६ रोजी ९९ वर्षे पूर्ण होत आहेत. 'शतकाचा वारसा... भविष्याचा ध्यास!' या संकल्पनेतून संस्थेच्या शताब्दी वर्षाला आज (दि. २६) प्रारंभ झाला. या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात प्रा. शिशिर कुमार बोलत होते. सोमवार पेठ येथील संस्थेच्या सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष संजीव ब्रह्मे, कार्याध्यक्ष संजीव महाजन, मानद सचिव प्रफुल्ल निकम, कोशाध्यक्ष निलेश येवलेकर, उपाध्यक्ष भारत वेदपाठक मंचावर होते.




या सोहळ्यात संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण, संस्थापक दिन विशेष कार्यक्रम तसेच यंदाच्या बोर्ड परीक्षेत रात्र प्रशालेतील महाराष्ट्रात प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केलेल्या वसुप्रद कुलकर्णी, अंकुश रेवाळे या गुणवंत विद्यार्थ्यांचा व एमपीएससी परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या निधी अत्रे यांचा गौरव करण्यात आला.

प्रा. शिशिर कुमार पुढे म्हणाले, शिक्षित असलेली व्यक्ती प्रबुद्ध आणि आनंदी असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानाचा साठा आणि कौशल्ये विकसित करण्याची ताकद देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमानी विद्यार्थी घडण्यास मदत होते. त्यामुळे कोणत्याही शिक्षकाने विद्यार्थ्याचे खच्चीकरण न करता तो कशा पद्धतीने आणि आवडीने शिकेल याचा विचार पेरत त्याच्या मनात बौद्धिक उत्सुकता निर्माण केली पाहिजे. यातूनच प्रत्येक व्यक्ती आयुष्यभर शिकत राहिल आणि ज्ञान आकलन करून घेण्यासाठी प्रश्न विचारत राहिल. दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक दूरदृष्टी असलेले होते. त्यांनी संस्थेच्या माध्यमातून समाजाचे भवितव्य बदलून टाकण्यासाठी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. हीच परंपरा पद्मविभूषण प्रभा अत्रे यांनी अखंडितपणे सुरू ठेवली आणि हेच कार्य संस्थेचे पदाधिकारी पुढे नेत आहेत.

शतक महोत्सवी वर्षाचे सिंहावलोकन करताना संजीव ब्रह्मे म्हणाले, राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली आहे. त्याच प्रमाणे रात्र प्रशाला सुरू करणे हा निर्णयही प्रगल्भपणे घेतला गेला आहे. प्रभाताई अत्रे यांची स्पंदने आजही या वास्तूत जाणवतात. या शाळेचा आलेख सातत्याने उंचावत जाताना दिसतो आहे. संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना संजीव महाजन म्हणाले, शतक महोत्सवी वर्षाला सुरुवात होणे ही फक्त कालगणना नव्हे तर इतिहासात घडलेल्या महान कार्याचा गौरव आहे. यात संस्थेचे संस्थापक, पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्यत्वेकरून विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने संस्था अखंडितपणे कार्यरत आहे.प्रफुल्ल निकम यांनी संस्थेची भविष्यकाळातील वाटचाल कशी असेल याविषयी अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. वर्षा महाजन यांनी सूत्रसंचालन केले तर भारत वेदपाठक यांनी आभार मानले.

# बेघरांसाठी जागा मोजणीचा फुटणार नारळ

■ चाकण : (दै. संध्या)

पाच हजार बेघर नागरिकांसाठी महाराष्ट्र शासना कडून अंतिम आदेश जारी करण्यात आला असून खेड तालुक्यातील चांदुसला बेघरांसाठी जागा मोजणीचा लवकरच नारळ फुटणार असल्याची ग्वाही भापसे पार्टीचे पक्ष प्रमुख दिपक ताटे यांनी दिली.

भापसे पार्टीच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या विजयी मेळाव्यात मार्गदर्शन करताना दीपक ताटे बोलत होते. यावेळी भापसे पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा जयश्री ताटे, लता गायकवाड, पल्लवी देडे, भाग्यश्री ताटे, काजल आव्हाळे, समाधान ताटे, उत्तम लोंढे, जालिंदर उपाडे, अश्रुबा जाधव, राजासाहेब देडे, विश्वनाथ गायकवाड, दत्तात्रय कळसकर, अलका सुरवसे, सुवर्णा लोंढे, रमेश गालफाडे आदींसह



विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपक ताटे पुढे म्हणाले," भापसे पार्टीच्या वतीने बेघर नागरिकांसाठी सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याला मंत्रालयीन पातळीवर सर्वोच्य यश आले आहे. खेड तालुक्यातील सरकारी जमीन गट क्रमांक ५९१, ४७४ आणि १४२ वर ५,००० बेघर नागरिकांना हक्काचे निवासी भूखंड मिळण्याचा मार्ग आता कायद्याने मोकळा झाला आहे. मंत्रालयातून महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने पत्र क्र. जमीन-३४२५/ प्र.क्र.५४७/जमीन-५, दि. १२/०८/२०२६ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना या जागेचा परिपूर्ण तांत्रिक प्रस्ताव सादर करण्याचे थेट आदेश दिले आहेत. भारतीय परिवर्तन सेना आणि समस्त लोकायुक्त कार्यालय, मुंबई, खटला क्रमांक १४५५५६/२०२६ येथे केलेल्या यशस्वी कायदेशीर लढ्यामुळे थेट राज्य सरकारने या प्रकरणात अंतिम हस्तक्षेप केला आहे." ताटे यांनी पुढे सांगितले की," संविधानाच्या कलम १६६ च्या तरतुदीनुसार निघालेल्या या आदेशात, मंत्रालयाने पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना शासन निर्णय दि. ०९/०२/२०१० च्या अन्वये "कोणतीही अतिरिक्त जाचक अट न लावता" 'अ, ब, क व ड' विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे सक्त वैधानिक निर्देश दिले आहेत.

# पिंगोरी आणि आडचीवाडीच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

■ नीरा (दै. संध्या)

पिंगोरी आणि आडचीवाडी येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांना पावसाळ्यातील निसर्गाचा आनंद लुटता यावा, यासाठी सामाजिक कार्यकर्ते दत्ताराजे शिंदे आणि मावडी गावचे युवा उद्योजक यशवंत शेठ जगताप यांच्या पुढाकारातून भुलेश्वर येथे मोफत श्रावणी सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीमध्ये जिल्हा परिषद शाळा पिंगोरी, जिल्हा परिषद शाळा आडचीवाडी आणि वाघेश्वरी माध्यमिक विद्यालय, पिंगोरी या शाळांमधील तब्बल १३० विद्यार्थी आणि १२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

पिंगोरी ते भुलेश्वर असा सहलीचा प्रवास करण्यात आला. पावसाळी वातावरण, हिरवाईने नटलेला परिसर आणि भुलेश्वर परिसरातील निसर्गरम्य वातावरणाचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. शैक्षणिक अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांना विरंगुळा आणि निसर्गाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमासाठी श्री दत्ताराजे शिंदे मित्रपरिवार आणि यशराज ट्रॅव्हलचे यशवंत जगताप यांनी विद्यार्थ्यांसाठी बसची व्यवस्था तसेच जेवणाचा संपूर्ण खर्च केला. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणताही आर्थिक भार न घेता सहलीचा आनंद घेता आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साह पाहून पालक व शिक्षकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारे आनंदाचे आणि निसर्गाच्या सान्निध्यातील क्षण अनुभवता यावेत.

# नृत्य कलेतून कलाकारांना परमानंदाची अनुभूती : वरदा वैशंपायन

■ पिंपरी (दै. संध्या)

भारतीय अभिजात नृत्यकला व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात फार मोलाची भर घालते. नृत्य कलेतून कलाकारांना परमानंदाची अनुभूती येते. मनाची एकाग्रता वाढून शारीरिक आणि मानसिक क्षमता वाढते. नृत्यकलांमध्ये संस्कृती संवर्धनाची क्षमता असून, संस्कारक्षम तरुण पिढीही निर्माण होते असे मार्गदर्शन नृत्यशारदा कथक कलामंदिर च्या संस्थापक वरदा वैशंपायन यांनी केले.

'नृत्योपासना 'भरत नाट्यम आणि ओडिसी नृत्यालयाचे स्नेह संमेलन पिंपरी येथे मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी वैशंपायन यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ निरुपणकार रविंद्रजी पाठक व स्नेहल सोमण, विद्यार्थी, पालक उपस्थित होते. यावेळी नृत्यालयात भरतनाट्यम



आणि ओडिसी नृत्य शिकणाऱ्या मुलींनी नृत्य सादरीकरण केले. वरदा वैशंपायन यांनी सर्वात कमी वयाची शिष्या रेवा कुंभार आणि आर्णा गुरु, हंसिनी रमेश, हर्षिता बिस्वाल यांच्या समवेत ओडिसी नृत्य सादरीकरण केले.

ओडिसी शिकणाऱ्या मुलींमध्ये रेवा ही वयाने सगळ्यात लहान विद्यार्थिनी होती. लहान वयात हे नृत्य शिकायला सुरुवात करून रंगमंचावर सुंदर नृत्य तिने सादर केले हे विशेष कौतुक आहे.

# शांततापूर्ण गणेशोत्सवासाठी आवाहन

■ नीरा: (दै. संध्या)

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नीरा व परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक सलोखा, शांतता आणि एकोप्याचा संदेश देणारा ठरावा, यासाठी सर्व मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. पाटील हे नीरा येथे आले होते यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.

यावेळी त्यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी काही सूचनांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या प्रत्येक गणेश मंडळाने अधिकृत नोंदणी करून घ्यावी.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृती व्हावी, यासाठी मंडळांनी वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृतीपर उपक्रम राबवावेत. धार्मिक अथवा सामाजिक सलोखा बिघडवणारे आक्षेपार्ह देखावे उभारू नयेत. चिथावणीखोर किंवा धार्मिक भावना दुखावणारी गाणी वाजवू नयेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

गणेशमूर्तीची सुरक्षा आणि मंडप परिसरातील सुरक्षितता लक्षात घेता सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण आणि मूर्तीच्या सुरक्षेसाठी सक्षम स्वयंसेवक नियुक्त करून ते २४ तास मंडळाच्या ठिकाणी उपस्थित राहतील, याची दक्षता घ्यावी,उत्सवादरम्यान महिलांची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची असून महिलांना कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा छेडछाड होणार नाही, याची मंडळांच्या कार्यकर्त्यांनी विशेष काळजी घ्यावी, असेही त्यांनी बजावले. मंडप, स्टेज किंवा मिरवणुकीमुळे सार्वजनिक रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची मंडळांनी दक्षता घ्यावी. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे."गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. नियमांचे पालन करून सामाजिक सलोखा कायम ठेवावा," असे आवाहन पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी केले. गणेशोत्सवाच्या नावाखाली व्यापारी, दुकानदार किंवा नागरिकांकडून वर्गणीसाठी कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये. नागरिक किंवा व्यापारी स्वेच्छेने देत असलेली मदतच स्वीकारावी, जबरदस्ती वर्गणी देण्यासाठी भाग पाडणे किंवा अन्य तक्रारी आल्यास त्यावर कारवाई केली जाईल.

# पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या लेकींनी राज्यपालांना बांधली राखी

■ सासवड (दै. संध्या)

रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याला घट्ट विणणारा रक्षाबंधनाचा पवित्र सण मुंबई येथील लोकभवनात अत्यंत भावनिक आणि आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण, ता. पुरंदर, जि. पुणे येथील माईंच्या लेकींनी महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा अनोखा स्नेहबंध जपला.

अनाथ मुली, दिव्यांग भगिनी, महिला स्वच्छता कर्मचारी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिला भगिनींनी लोकभवन, मुंबई येथे राज्यपालांची भेट घेऊन त्यांना रक्षाबंधनानिमित्त राखी बांधली. या वेळी राज्यपालांनी सर्व भगिनींना रक्षाबंधनाच्या



मनःपूर्वक शुभेच्छा देत भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला. "रक्षाबंधन हा समाजातील सर्व घटकांना प्रेम, आपुलकी आणि बंधुभावाच्या धाग्याने एकत्र आणणारा पवित्र सण आहे. समाजाच्या विविध स्तरांवर उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिला व मुलींसोबत यंदाचे रक्षाबंधन साजरे करण्याचा मला विशेष आनंद झाला," अशी भावना राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी व्यक्त केली. ममता बाल सदनच्या मुलींशी संवाद साधताना राज्यपालांनी केवळ औपचारिकता न राखता अत्यंत आपुलकीने प्रत्येक मुलीचे पूर्ण नाव, ती कोणत्या वर्गात किंवा अभ्यासक्रमात शिक्षण घेत आहे, तिची आवड आणि भविष्यातील ध्येय याबाबत विचारपूस केली. राज्यपालांनी दाखविलेल्या या आपुलकीमुळे माईंच्या लेकींच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. "तुम्ही सर्व मुली मन लावून, गुणवत्तापूर्ण शिक्षण घ्या आणि भविष्यात मोठ्या पदावर जाऊन देशाची व समाजाची सेवा करा," असा प्रेमळ सल्ला देत राज्यपालांनी सर्व मुलींना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले. यावेळी माईंच्या लेकींनी लोकभवनातील उपस्थित अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा अधिकारी तसेच संपूर्ण कर्मचारीवृंदालाही राख्या बांधून रक्षाबंधनाचा आनंद द्विगुणित केला. त्यामुळे लोकभवनातील वातावरण काही काळासाठी एका मोठ्या कुटुंबाप्रमाणे स्नेह, माया आणि आपुलकीने भारावून गेले. माईंच्या लेकींनी तयार केलेला विदर्भाचा प्रसिद्ध गोरसपाक संस्थेचे अध्यक्ष दिपक दादांनी त्यांना भेट दिला.

या प्रसंगी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, खाजगी सचिव अर्चना गायकवाड, जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर, एडीसी नवदीप अग्रवाल, माईंच्या लेकी कु. मीनल सिंधुताई सपकाळ, कु. साक्षी सिंधुताई सपकाळ, कु. आकांक्षा भगत, कु. पावनी सिंधुताई सपकाळ, कु. श्रावणी कामठे, तसेच पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदन (बालगृह) संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड, गोपाल देशी गोशाळेचे व्यवस्थापक प्रसन्न गायकवाड, नाना कुंभारकर यांच्यासह विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पेसा भागातील शिक्षकांच्या समस्यांबाबत मंत्री झिरवळांना निवेदन

नारायणगाव : दैनिक संध्या

पेसा क्षेत्रातील शाळा आणि शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल जुन्नर तालुका व पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांची भेट घेतली. यावेळी शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन मंत्री झिरवळ यांना देण्यात आले. पेसा क्षेत्रातील शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. निवेदनात प्रामुख्याने खालील मागण्या मांडण्यात आल्या आहेत- १२,५०० पदांची तातडीने भरती: पेसा क्षेत्रातील रिक्त असलेली १२,५०० शिक्षकांची पदे तातडीने भरली जावीत. कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करणे: १७ संवर्गातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्यात यावे. कामकाजातून मुक्ती: प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळांना व मुख्याध्यापकांना अन्नसुरक्षा नोंदणी व परवाना या जाचक अटींमधून पूर्णपणे वगळण्यात यावे. प्रोत्साहन भत्ता वाढ: आदिवासी भागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता ४०० रुपयांवरून वाढवून १,५०० रुपये करण्यात यावा. स्वतंत्र धोरणे व योजना: आदिवासी पेसा क्षेत्रातील शाळा आणि शिक्षकांसाठी स्वतंत्र शैक्षणिक व विविध प्रोत्साहनपर योजनांची निर्मिती करावी. या प्रसंगी अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुभाष मोहरे, तालुका सरचिटणीस रामदास गवारी, संघटक नामदेव दाभाडे, जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम हगवणे, आनंदा मांडवे, नंदकुमार साबळे, सुदाम उतळे, काळू मेमाणे, तान्हाजी सांगडे,भरत रोंगटे यांच्यासह अनेक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री विठ्ठल मंदिर उत्सव आनंदात साजरा

काऱ्हाटी : दैनिक संध्या

काऱ्हाटी ता. बारामती येथील श्री विठ्ठल मंदिर उत्सव आनंदात साजरा. श्री विठ्ठल प्रसादिक भजनी मंडळाचे वतीने सकाळी रुद्राभिषेक करण्यात आला. सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत भजन आदी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी मंडळाच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. यावेळी मंडळाचे सल्लागार सुरेश नाना वाबळे, विनायक चांदगुडे, अध्यक्ष बाळासाहेब महाराज वाबळे, उपाध्यक्ष प्रकाश बर्गे, अरविंद वाबळे, चंद्रकांत लोणकर, मीरा परुळेकर, अलका लोणकर, रेखा बर्गे, अरुणा चांदगुडे, रूपाली लोणकर, भजनी मंडळी व ग्रामस्थ बहुसंख्य उपस्थित होते.

### अध्यक्षपदी अशोक खंडाळे यांची निवड

काऱ्हाटी : दैनिक संध्या



काऱ्हाटी ता. बारामती येथे तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी अशोक खंडाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी मावळते अध्यक्ष विनोद वाबळे यांचा कार्यकाल संपल्याने अध्यक्ष पदी खंडाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच दिपाली लोणकर, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण खंडाळे, शेखर खंडाळे, ग्रामपंचायत सदस्य आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात वासरू मृत्युमुखी

जेजुरी : दैनिक संध्या

जेजुरी कडेपठार रस्त्यालगत असलेल्या दोरगेवाडी येथे ५ ते ६ भटक्या कुत्र्यांनी सकाळी १० वाजता गोठ्यातील गाईच्या वासरावर हल्ला केला. या हल्ल्यात वासरू (कालवड) मृत्युमुखी पडले. याबाबत सविस्तर माहिती अशी की दोरगेवाडी येथे रस्त्याकडेला सुदाम माळवदकर यांची शेती आहे. या शेतातील गोठ्यामध्ये गाय व वासरू बांधलेले होते. सकाळी दहाच्या सुमारास पाच ते सहा भटक्या कुत्र्यांनी अचानक या वासरावर हल्ला केला, गाय ओरडू लागल्याने घरातील महिला बाहेर आल्या त्यांनी कुत्र्यांना हाकलले, मात्र मोठ्या प्रमाणात कुत्र्यांनी वासराचे लचके तोडल्याने ते जबर जखमी झाले होते. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी जेजुरी येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भूषण लोखंडे यांना बोलावून जागेवरच वासरावर उपचार केले, प्रचंड रक्तस्राव झाल्याने ते वाचू शकले नाही. कुत्र्यांनी अशाप्रकारे लहान वासरावर हल्ला केल्याने आजूबाजूच्या पशुपालक शेतकरी व लहान मुलांच्या पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. जेजुरीत भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून रात्रीच्या वेळी मोठ्या संख्येने कुत्र्यांचे कळप रस्त्याने दिसतात. स्थानिक ग्रामस्थाबरोबरच लहान मुलांना, भाविकांना यांची भीती वाटते. नगरपालिकेने या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

### फलकाविना दुचाकी उचलल्याचा आरोप

आळंदी : दैनिक संध्या

आळंदी शहरातील प्रदक्षिणा मार्ग, भाजी मंडई व मरकळ रस्त्यावर 'नो पार्किंग'चे फलक नसतानाही दुचाकी वाहने उचलून ७०० रुपये दंड वसूल केला जात असल्याचा आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) व्यापारी आघाडीने केला आहे. वाहन उचलण्यापूर्वी सूचना दिली जात नाही, कारवाईचे छायाचित्रण केले जात नाही तसेच टोईंग कर्मचारी गणवेशात नसतात, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. वाहन नेल्यानंतर त्याचे ठिकाणही वाहनधारकांना सांगितले जात नसल्याचे संघटनेने म्हटले आहे. या प्रकाराची चौकशी करून कारवाई थांबवावी, अशी मागणी रिपाइं व्यापारी आघाडीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नियती विकास शिंदे यांनी केली आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास ९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता आळंदी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

### ६.०८ लाख मतदारांची नावे वगळली

पिंपरी : दैनिक संध्या

मतदार याद्यांच्या पडताळणी (एसआयआर) मोहिमेत पिंपरी-चिंचवड शहरातील 17 लाख 24 हजार 537 मतदारांपैकी तब्बल 6 लाख 8 हजार 148 मतदारांची नावे गायब झाली आहे. मतदारांची प्रारूप मतदार यादी 31 ऑगस्टला प्रसिद्ध होणार आहे. यादीत नाव आहे की नाही, हे मतदारांनी तपासून घ्यावे. यादीत नाव नसल्यास त्यावर हरकत नोंदवता येणार आहे. त्यासाठी महिन्याभराची मुदत आहे. मतदार पडताळणी 17 ऑगस्टपर्यंत करण्यात आली. त्यात शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघातील तब्बल 6 लाख 8 हजार 148 मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. गैरहजर, स्थलांतरीत, मयत, दुबानर किंवा अन्य कारणांमुळे त्यांची नावे वगळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.